RNI NO. MAHMAR/2020/84035




BAHUJAN SAURABHA

# बहुजन सौरभ




शनिवार, १० मे २०२५ | वर्ष : ५ | अंक : १३२ | दैनिक | किंमत : ₹ ५/-
Saturday, 10 May 2025 | Year : 5 | Issue : 132 | Daily | Rate: Rs. 5/-

### प्रलंबित स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी

# सर्वोच्च न्यायालय आग्रही का?

**मुंबई :** सर्वोच्च न्यायालयाने महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाला मुंबई महानगरपालिका आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रलंबित निवडणुका अधिसूचित करून घेण्याचे आणि आयोजित करण्याचे आदेश दिले आहेत. हा आदेश म्हणजे केवळ न्यायालयीन हस्तक्षेप नाही, तर राज्यातील स्थानिक पातळीवर लोकशाही कामकाजाची पुनर्रचना करण्याचा एक प्रयत्न आहे. असे असताना मुंबई महानगरपालिका आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका प्रलंबित राहण्यामागे राजकीय गणिते, कायदेशीर अडथळे व प्रशासकीय त्रुटी असा एक चक्रव्यूहच आहे. त्याचा परिणाम केवळ राजकीय स्थितीवरच नाही, तर महाराष्ट्राच्या तळागाळातील विकासावरही झाला आहे.

बहुतेक महानगरपालिका आणि जिल्हा परिषदा सध्या प्रशासकांद्वारे चालवल्या जात आहेत. प्रामुख्याने अधिकारी, निवडून आलेले प्रतिनिधी यांच्याशिवायही त्या चालवल्या जात आहेत. त्यामुळे लोक त्यांच्या राजकीय प्रतिनिधींपासून दुरावल्याने एकूणच प्रतिनिधींची जबाबदारीही कमी झाली आहे. याकडे राजकीय दृष्ट्या पाहिले, तर सर्व प्रमुख पक्षांना म्हणजेच भाजपा, शिवसेना (शिंदे गट), राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट), शिवसेना (उबाठा) व काँग्रेस यांना विस्तारित प्रचारस्थितीत काम करण्याची संधी मिळाली आहे. या मिळालेल्या वाढीव वेळेचा वापर पक्षांनी मतदार आधार मजबूत करणे, पुन्हा युती करणे आणि कहाणी बदलणे यांसाठी केला आहे. बीएमसीमध्ये शिवसेना (उबाठा) आणि शिंदे सेना यांच्यातील लढाई प्रतिष्ठेची लढाई म्हणून पाहिली जाते. या विलंबाचा फायदा विशेषतः सत्ताधारी पक्षांनाही झाला आहे. त्यांनी निवडणुका टाळून, प्रशासन, महागाई किंवा नागरी समस्यांवरील सार्वजनिक तक्रारींमुळे उद्भवणाऱ्या कोणत्याही तत्काळ निवडणूक प्रतिक्रियेपासून दूर राहून काम केले आहे.

याव्यतिरिक्त राजकीय संदिग्धतेमुळे मतदारांमध्ये वाढत्या प्रमाणात संशय निर्माण झाला आहे. राजकीय निकालांमध्ये फेरफार करण्यासाठी पक्ष निवडणुका टाळत आहेत, अशी धारणा झाल्याने लोकशाही संस्थांची विश्वासार्हता ढासळली जात आहे. त्यामुळे सत्तेच्या राजकारणासाठी निवडणूक प्रक्रिया लांबणीवर टाकल्या जात आहेत, असे लोकांना वाटू लागले आहे.




### महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका प्रलंबित का?

महाराष्ट्रात प्रामुख्याने मुंबई, पुणे, ठाणे व नागपूर या महानगरपालिकांमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्यास विलंब झाला आहे. त्यामागे कायदेशीर अस्पष्टता आणि राजकीय नाराजी असल्याचे आढळून येते. सर्वोच्च न्यायालयाचा 2002 चा निकाल हा एक महत्त्वाचा टप्पा होता. त्यामध्ये राज्याने प्रायोगिक तत्त्वावर आधारित माहिती गोळा केल्यानंतरच ओबीसी कोट्याचा समावेश करणे अनिवार्य केले होते. त्यामुळे राज्य निवडणूक आयोगाला मागासवर्गीय आयोगाला व्यापक अहवाल सादर करेपर्यंत निवडणुका थांबवाव्या लागल्या. असे असतानाही आयोगाने त्यांनी गोळा केलेली माहिती सादर केल्यानंतरही निवडणुका अद्याप झाल्याच नाहीत. नंतरच्या सरकारने आधी महाविकास आघाडी आणि आता आताचे भाजपा-शिवसेना (शिंदे गट) व राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) यांच्या नेतृत्वाखालील युती सरकार निवडणुकांबाबत हालचाल करतांना दिसत नाही. वॉर्डच्या सीमा पुन्हा पुनर्निर्धारित करण्यात आणि आरक्षण यादी अंतिम करण्यात या सरकारांनी हात मागे घेतल्याचे दिसून आले. अनेक निरीक्षकांच्या मते, याला राजकीय नाराजीच कारणीभूत असल्याचे दिसते. दोन्ही आघाड्यांना महत्त्वाच्या महानगरपालिका संस्था हातून जाण्याची भीती आहे. ही भीती प्रामुख्याने शहरी भागात आहे, जिथे 2019 आणि 2024 च्या लोकसभा निवडणुकीनंतर मतदारांच्या मतांमध्ये फरक पडला आहे.

## भारतीय सशस्त्र दलात नागपूरच्या नारीशक्तीचेही योगदान



**नागपूर :** भारतीय सशस्त्र दलाने पाकिस्तानविरुद्ध 'ऑपरेशन सिंदूर' हाती घेतले. त्याबाबतची माहिती दोन महिला अधिकाऱ्यांनी देशाला दिली आणि सशस्त्र दलातील नारीशक्तीची देशभर चर्चा होऊ लागली. हवाई दलातील नारीशक्तीमध्ये नागपूरचेही योगदान आहे. नागपूरच्या अंतरा मेहता या भारतीय हवाई दलात लढाऊ वैमानिक झालेल्या महाराष्ट्रातील पहिल्या महिला अधिकारी आहेत. पाकिस्तान पुरस्कृत दहशतवाद्यांनी पहलगाम येथील बैसरन खोऱ्यात 26 पर्यटकांना ठार केले. त्याला प्रत्युत्तर देण्यासाठी भारताने 'ऑपरेशन सिंदूर' हाती घेतले आहे. यामध्ये सर्वांत महत्वाची भूमिका भारतीय हवाई दलाची आहे. गुप्तचर खात्याच्या माहितीच्या आधारे पाकव्याप्त काश्मीर आणि पाकिस्तानमधील दहशतवाद्यांचे नऊ तळ उद्धवस्त करण्यात आले. या कारवाईची माहिती देण्यासाठी दोन महिला अधिकारी माध्यमांसमोर आल्या. महाराष्ट्रातील पहिल्या लढाऊ वैमानिक अंतरा मेहता आहेत. त्या 2020 मध्ये हवाई दलात सहभागी झाल्या.त्यावेळी फायटर स्ट्रीमसाठी निवड झालेल्या अंतरा या आपल्या बॅचमधील एकमेव महिला अधिकारी होत्या. अंतरा मेहता यांचे प्राथमिक शिक्षण माऊंट कार्मेल गर्ल्स स्कूलमध्ये झाले. अभियांत्रिकीचे शिक्षण त्यांनी रामदेवबाबा कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंटमधून पूर्ण केले. नागपूरच्या अंतरा मेहता या भारतीय हवाई दलात लढाऊ वैमानिक झालेल्या महाराष्ट्रातील पहिल्या महिला अधिकारी आहेत.याशिवाय सिद्धी हेमंत दुबे या नागपूरकर महिला नौदलात वैमानिक आहेत. त्या 2023 मध्ये नौदलात सहभागी झाल्या. सिद्धी दुबे यांचे शिक्षण नागपूरच्या रामदेवबाबा अभियांत्रिकी व व्यवस्थापन महाविद्यालयात झाले.

## नागपूरच्या रस्त्यांची अवस्था बघून... एनएचएआय अधिकाऱ्यांना निर्देश



**नागपूर :** शहरातून जाणाऱ्या विविध महामार्गांच्या दुरवस्थेबाबत वारंवार तक्रारी येत असल्याने मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने तीव्र शब्दात नाराजी व्यक्त केली. कंत्राटदारांच्या मनमानी कारभाराला 'एनएचएआय' आळा घालू शकत नाही, असे भाष्य करून प्रकल्प संचालकाच्या वर्तवणुकीवर शंका व्यक्त करत न्यायालयाने चौकशीची तंबी दिली. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या प्रकल्प संचालकाच्या पगारातून एक लाख रुपये न्यायालयात जमा करण्याचे निर्देश दिले. शहरातून जाणाऱ्या विविध महामार्गाबाबत उच्च न्यायालयात विविध जनहित याचिका दाखल आहेत. या सर्व याचिकांवर न्यायालयाने गुरुवारी एकत्रितपणे सुनावणी घेतली. एनएचआयच्यावतीने नागपूर ते फेटरी दरम्यान असलेल्या रस्त्याचे रुंदीकरण करण्यात येत आहे. मागील वर्षी नोव्हेंबरमध्ये हे कार्य एप्रिलपर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश न्यायालयाने दिले होते. मात्र गुरुवारी झालेल्या सुनावणीत कार्य पूर्ण करण्यासाठी 30 जूनपर्यंत अतिरिक्त कालावधी देण्याची विनंती एनएचएआयच्याने केली. न्यायालयाने कारण विचारल्यावर एनएचएआयने मार्गावर असणाऱ्या वृक्षतोडीची परवानगी उशिरा मिळाल्याचे सांगितले. नोव्हेंबर महिन्यात न्यायालयाचे स्पष्ट आदेश असतानाही जानेवारी 2025 मध्ये परवानगी दिली गेली. एनएचएआयने यासाठी वृक्ष प्राधिकरणाकडे बोट दाखवले, मात्र न्यायालयाला याबाबत अंधारात ठेवले. यामुळे न्यायालयाने एनएचएआयवर तीव्र शब्दात नाराजी व्यक्त केली. एनएचएआय प्रकल्प संचालकाची भूमिका संशयास्पद आहे. एनएचएआयच्या प्रत्येक प्रकल्पात समस्या दिसत आहेत. महामार्गाची दुरुस्ती तसेच वृक्षारोपण कंत्राटदारांसाठी शेवटची प्राथमिकता आहे. एनएचएआय प्रकल्प संचालक याकडे लक्ष देत नाहीत, असे मत व्यक्त करत न्यायालयाने महामार्गाचे कार्य पूर्ण करण्यासाठी अतिरिक्त कालावधी मंजूर केला. मात्र यासाठी प्रकल्प संचालकाच्या पगारातून एक लाख रुपये न्यायालयात जमा करण्याचे निर्देश दिले.

## एसटी 'च्या नव्या बसेस हायब्रीड इंधनावर



**नागपूर :** एसटी महामंडळ दरवर्षी 5 हजार याप्रमाणे पुढील 5 वर्षांमध्ये 25 हजार बसेस घेण्यात येणार आहेत. वर्ष 2025-26 पासून उर्वरित 20 हजार बसेस या पर्यावरण पूरक अशा सी.एन.जी. व एल.एन.जी. सारख्या इंधनाबरोबर डिझेल इंधन हायब्रीड करून चालणाऱ्या असतील. डिझेल इंधनाचा वापर केवळ आपत्कालीन परिस्थितीत केला जाईल, जेणेकरून बस प्रवाशांची गैरसोय होणार नाही, असे नियोजन असल्याची माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.

## पाकिस्तानकडून सीमेवरील 36 ठिकाणी ड्रोन्सनी हल्ला



**नवी दिल्ली :** पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर प्रत्युत्तर म्हणून भारताने 7 मे रोजी मध्यरात्री पाकिस्तानच्या दहशतवादी तळावर हल्ले केले. या हल्ल्यात 100 हून अधिक दहशतवादी मारले गेले होते. दरम्यान यानंतर भारत आणि पाकिस्तानाने एकमेकांवर हल्ले केले आहेत. काल देखील पाकिस्तानकडून भारताच्या हवाई हद्दीत ड्रोन सोडण्यात आले होते. ज्याला भारतीय लष्कराने चोख प्रत्युत्तर दिले. या पत्रकार परिषदेत कर्नल सौफिया कुरेशी यांनी सांगितलं की, '8 ते 9 मे 2025च्या मध्यरात्री पाकिस्तानी लष्कराने लष्करी पायाभूत सुविधांना लक्ष्य करण्याच्या हेतूने संपूर्ण पश्चिमी लष्करावरील भारतीय हवाई सीमेचे वारंवार उल्लंघन केले. इतकेच नाही तर पाकिस्तानी लष्कराने नियंत्रण रेषेवर मोठ्या कॅलिबरच्या हत्यारांनी गोळीबार देखील केला. आंतरराष्ट्रीय सीमा आणि नियंत्रण रेषेवर लेहपासून ते सर क्रीक पर्यंत 36 ठिकाणी सुमारे 300 ते 400 ड्रोन्सचा वापर घुसखोरीसाठी केला. भारतीय सुरक्षा दलांनी कायनेटिक किंवा नॉन कायनेटीक साधनांच्या मदतीने यापैकी काही ड्रोन्स पाडले.

## ऑपरेशन सिंदूरमध्ये नागपूरच्या नागास्त्राचा वापर



**नागपूर :** भारताने पाकव्याप्त काश्मीर (पीओके) मधील पाकिस्तानातील दहशतवादी तळांवर हल्ला करण्यासाठी नागपुरात तयार करण्यात आलेल्या नागास्त्र-1 वापर प्रभावीपणे केला आहे, असे सांगण्यात येते.नागपूरच्या सोलर ग्रुपने बनवलेले नागास्त्र-1 युद्धसामग्री लष्कराने कमी अंतराच्या लक्ष्यांवर हल्ला करण्यासाठी तैनात केले होते. सोलर ग्रुपने इस्त्रायल आणि पोलंडच्या जागतिक उत्पादकांना मागे टाकून लष्कराकडून कंत्राट जिंकले होते, असे सूत्रांनी सांगितले. ऑपरेशन सिंदूरमध्ये सोलार समूहाद्वारे उत्पादित नागास्त्र-1 या स्वदेशी आत्मघाती ड्रोनचा वापर झाल्याची माहिती आहे. हे मानवरहित ड्रोन 1.5 किलो पर्यंत स्फोटके वाहून नेऊ शकते. 'सायलेंट किलर' अशी ओळख या ड्रोनची आहे. ड्रोन अर्थात अनमॅन्ड एरियल व्हेइकल्सचे युद्धात प्रचंड महत्व वाढले आहे.

## भारत-पाकिस्तान तणावामुळे नागरिकांमध्ये भीती



**नवी दिल्ली :** गेल्या काही दिवसांपासून भारत आणि पाकिस्तानमध्ये पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारतीय लष्कराने केलेल्या ऑपरेशन सिंदूरनंतर तणावाची परिस्थिती निर्माण झाली आहे. अशात काल पाकिस्तानने भारतातील काही शहरांवर ड्रोन हल्ले करण्याचा अयशस्वी प्रयत्न केला. पाकिस्तानाच्या कृत्याला भारतीय सैन्याने जोरदार प्रत्युततर दिले आहे. या घटनांमुळे सीमेलगतच्या शहरांतील नागरिकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. या भितीने नागरिकांनी अन्नधान्य आणि इंधनाच्या खरेदीसाठी धावपळ सुरू केली आहे. या पार्श्वभूमीवर चंदीगड प्रशासनाने शुक्रवारी जीवनावश्यक वस्तूंच्या साठ्याविरुद्ध कडक कारवाई करण्याचा इशारा दिला आहे. अशा कृतींमुळे कृत्रिम टंचाई निर्माण होत आहे, किमतीत वाढ होत आहे आणि यामुळे सार्वजनिक सुव्यवस्था बिघडू शकते, असे म्हटले आहे.


## पुज्य डॉ. भदन्त सावंगी मेधंकर महास्थविर यांच्या 25 व्या पुण्यस्मरण निमित्त अभिवादनिय आदरांजली!




ऑल इंडिया भिक्खु संघचे संघनायक, बौद्ध प्रशिक्षण संस्थान, बुद्धभुमी महाविहार, राहुल बाल सदन, बुद्धभुमी प्रकाशन, भारत आनंद कौसल्यायन बुक डेपोचे संस्थापक, आधारवड, कुशल संघटक, लेखक, उद्‌बोधक

अभिवादक



भदंत नागदिपंकर महास्थविर
आणि ऑल इंडिया भीक्खु संघ विदर्भ प्रदेश, बौद्ध प्रशिक्षण संस्थान, बोधीमग्गो सेवा संस्था, आलोका ट्रस्ट, वटथाई इंडियन बुद्धिस्ट मोनेस्ट्री, भारतीय बुद्ध धम्म ज्ञान विद्यालय, बौद्ध इतिहास संस्कृती संशोधन संस्था नागार्जुन संग्रहालय.



“ सत्य, इमानदारी, आणि नम्रता ही जीवनातील सर्वोच्च मूल्ये आहेत. ”

बहुजन सौरभ
BAHUJAN SAURABHA



## संपादकीय

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्ताने 45 लाख रुपये शिल्लक

मुडी गावाने 45 लाख रुपये जयंतीची रक्कम शिल्लक ठेऊन सर्वत्र चर्चा होत आहे. हा आदर्श केवळ आंबेडकर जयंतीला झाला आणि विचारांचे चक्र गतीमान होऊ लागले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्ताने विविध विचार प्रवाहाला वाचा फुटली होती. ही जयंती कशी साजरी करावी. या संदर्भात अनेकांचे लेख दैनिक बहुजन सौरभ ने प्रकाशित केले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जयंती संदर्भात अनेक लेखकांनी प्रेरणादायी संदेश दिला आहे. सामाजिक भान असणाऱ्या लोकांनी आपआपले विचार प्रवाह विविध समाज माध्यमातून चर्चेचा विषय म्हणून पुढे आणला होता. जयंतीला काय करू आणि काय करू नये ? यावर अनेक मत विचार वैयक्तिकपणे मांडण्यात आले होते. काही प्रमाणात टीकाटिपणी असणारे विचार प्रवाह होते परंतु त्यातूनही काही समाज उपयोगी आणि समाजाला उंच शिखरावरती घेऊन जाणारे विचार प्रवाह सर्व सामान्य लोकांनी व्यक्त केले होते. लोकांमध्ये लोकांसाठी काम करणाऱ्या लोकांची मतप्रवाह हे मात्र विशेषता दखल घेण्यास पात्र ठरले आहे. त्यामुळे अनेकांनी जयंती साजरी करित असताना या जयंतीला कोणतेही गालबोट लागू नये ही प्रकर्षाने काळजी घेण्यात आली होती. विशेषता शहरांमध्ये मोठ्या प्रमाणात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जयंती साजरी होत असते. गाव खेड्यामध्ये त्यांच्या लोकसंख्येनुसार ती साजरी करीत असतात. 2025 मधे महाराष्ट्र शासनाने प्रत्येक ग्रामपंचायतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करावी म्हणून अध्यादेश काढलेला होता त्यानुसार महाराष्ट्रामध्ये प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये शासकीय स्तरावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी झाली. ज्या ग्रामपंचायतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी केली नाही त्यांना कारणे दाखवा नोटीस आणि त्यांच्यावर मोठी कारवाई केली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती ची दखल ही सर्वसामान्य लोकांनी घेतली होती हे प्रकर्षाने जाणवते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार हे सर्व समाजाचे विचार आणि भारत देश मजबूत करण्याच्या दिशेने असणारे विचार आहेत या विचाराला लोक मान्यता मिळालेली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांमध्ये देश आणि माणूस ही दोनच विचार दिसतात. आंबेडकरी विचारांचा प्रसार आणि प्रचारासाठी ज्यांनी योगदान दिले आहे त्या सर्वांना धन्यवाद देणे आवश्यक आहे. एखादा विचार रुजविण्यासाठी किती तरी पिढ्या निघून जातात. उदा. हजारो लेण्या तयार करतांना किती तरी सम्राट, राजे, भिख्खू, कलावंत, उपासक आणि अनामिक कलावंत लोकांनी आपल्या प्राणाची आहुती दिली आहे. तेच धोरण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या निष्ठावान अनुयायीनी केले आहे. उपेक्षित, वंचित, बहिष्कृत लोकांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या योगदानाची पदोपदी आठवण येते म्हणून अनेक कुटुंबात भोजन करण्यापुर्वी जयभीम म्हणून पहिला घास तोंडात घेतला जातो. आम्ही खातोय त्या भाकरी वर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची सही आहे रे असे महान गायक कडूबाई खरात यांचे सर्वत्र गाणे गाजत आहे. तर अनेक कारवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची स्वाक्षरी असणाऱ्या मोटार गाड्या दिसतात. डॉ. बाबासाहेब आता सर्वसामान्य लोकांचे झाले आहे. ज्या लोकांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीची सुरुवात केली त्या लोकांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आमच्यावर किती उपकार केले आहेत म्हणून आम्ही त्यांची जयंती साजरी करित आहोत असा संदेश दिला आहे. आंबेडकरी विचार म्हणजे आमचा श्वास, आमच्या प्राण असे अनेकांचे गौरव शब्द आहेत. डॉ. बाबासाहेबांची जयंती म्हणजे एक मोठा विचारांचा महा महोत्सव होय. ज्या विचारातून अनेक जुन्या परंपरा, रुढी, देव, धर्म सारे सर्व नष्ट होतात. सर्वानी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती ही मोठ्या उत्साहात थाटात साजरी केली आणि पुढे ही करतील. जे शहरातही जमले नाही असे एका छोट्या गावाने 45 लाख रुपयाचा निधी जयंतीच्या दिवशी शिल्लक ठेवणे ही किती मोठी किमया म्हणता येईल. देशभरातील विविध जयंती साजरी करणाऱ्या लोकांना हा संदेशच म्हणता येईल. एका छोट्या खेडेगावातील लोकांनी 45 लाख रुपये जयंतीतून शिल्लक ठेवावे हा आदर्शच म्हणता येईल. अर्थशास्त्रज्ञ डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती म्हणजे मोठे विचार शक्तिप्रदर्शन होय. धन नाही अश्या लोकांनी डॉ. बाबासाहेबांच्या जयंतीला 45 लाख रुपये शिल्लक ठेवणे ही जादू नाही तर प्रत्यक्ष घडलेली घटना होय. हा आदर्श इतरांनी घ्यावा आणि अश्या शिल्लक रकमेतून समाज उपयोगी कार्य करावे. जेणेकरून या समाजाची मान ही उंचावेल आणि ताठ मानेने स्वाभिमानाने राहील असा संदेश एका छोट्या खेड्याने दिलेला आहे . त्या सर्व ग्रामस्थांचे स्वागत आणि अभिनंदन करणे क्रमप्राप्त आहे. हिंगोली जिल्ह्यातील वसमत तालुक्यातील मुडी गावात 1500 लोक संख्या असलेल्या एका आदर्श गावातील बौध्द समाजाने डि.जे.मुक्त जयंती साजरी करून 45 लाख (पंचेचाळीस लाख रूपये) शिल्लक ठेवत बौध्द समाजात एक आदर्श निर्माण केला आहे. मुंडी गावात 2012-13 ला बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जयंती साजरी करून 2700/- शिल्लक राहिले असता हे पैसे काही लोकांना एक वर्षासाठी व्याजाने दिले असता एका वर्षानंतर 5400/- जमा झाले. जेष्ठ मंडळींनी युवकांना समोर करून त्यांची एक समिती स्थापन केली आणि प्रत्येक जयंती DJ मुक्त साजरी करून शिल्लक पैसे व्याजाने देऊन एप्रिल महिन्यात 13 तारखेला पैसे जमा करण्याची पद्धत सातत्याने चालू ठेवली या कामात कुणीही विरोध केला नाही उलट सर्वांनी सहकार्य केले त्यामुळे पहाता पहाता मुडी गावातील बौध्द समाजाकडे आज 45लाख (पंचेचाळीस लाख रूपये) शिल्लक आहे, मुडी गावातील एका पदाधिकाऱ्या कडून त्यांच्या गावी या पैशातून एक दवाखाना सुरू करायचा आहे अशी माहिती मिळाली आहे. निश्चितच ही बाब अभिनंदन करण्यासारखी आहे, जर प्रत्येक गावातील युवकांनी एकत्र येऊन DJ मुक्त जयंती साजरी करण्याचा धाडसी निर्णय घेतला वैचारिक कार्यक्रमाचे आयोजन केले तर प्रत्येक गावात हा अमुलाग्र बदल होऊ शकतो जर असे झाले तर निश्चितच आपण समाजाच्या विकासासाठी विविध उपक्रम राबविण्यात सक्षम होऊ शकतो असे आम्हाला वाटते. ■■

बहुजन सौरभ

# देशातील जात्यांध धर्मांधाविरूद्ध ऑपरेशन कधी?



पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने मंगळवारी रात्री प्रत्युत्तर म्हणून नऊ दहशतवादी अड्ड्यांवर ऑपरेशन सिंदूर हल्ला केला आणि दहशतवाद्यांचे अड्डे उद्धवस्त करून त्यात समाधान मानले आणि देश सुरक्षित आहे याची खात्री दिली, त्याबद्दल भारतीय तिन्ही दलांचे मी एक भारतीय नागरिक म्हणून आभार मानतो. त्यांच्या अप्रतिम शौर्याला आणि धैर्याला सलाम करतो आणि पाकिस्तानचे नऊ दहशतवादी अड्डे नष्ट केल्याबद्दल पाठही थोपटतो. पण त्यापूर्वी प्रधानमंत्री यांनी मात्र तिन्ही भारतीय दले बाजूला सारून देशासमोर असा देखावा निर्माण केला, असा आव आणला की, आता मी एकटाच पाहतो पाकिस्तान जगाच्या नकाशावर कसा दिसतो ते. त्यांचा हा अविर्भाव मात्र नागरिकांच्या मनाला पटला नाही. यासह मोदी सरकारकडून देशभर मॉक ड्रीलच्या नावाखाली संपूर्ण देश वेठीस धरला. सगळे पोलीस बल आणि सगळे दल कामाला लावले. सुरक्षेच्या नावाखाली नागरिकांत भीती दाखवली गेली. आता भारत - पाक यांच्यात शेवटचे अटीतटीचे भयंकर युद्ध होणार, अशी वातावरण निर्मिती, आणि तसे चित्र टिव्हीवरून रंगवले गेले, प्रधानमंत्री आता हातात तलवार घेऊन निधड्या छप्पन इंच छातीने पाकिस्तान सोबत भिडणार! एवढेच मिडीयावाले सांगायचे राहून गेले. तिन्ही दल पाकिस्तानची राजधानी इस्लामाबाद, पेशावर, लाहोर ई. मोठ्या शहरांवर बॉम्ब वर्षाव करणार आहेत आणि मग अशा युद्धजन्य परिस्थितीत सामान्य नागरिकांनी कशी काळजी घ्यायची, याची काळजी प्रधानमंत्रीच जास्त घेताना दिसले. याचे प्रात्यक्षिक देशातील 259 जिल्ह्यात करणार असल्याचेही वाचण्यात आले. कोरोना काळाची आठवण यावेळी झाली. रोग एक, उपचार भलताच. कोरोना घालवण्याची उपचार पद्धती होती ती टाळ्या थाळ्या वाजवण्याची, दिवे बंद करून घरात बसण्याची आणि गो करोना गो म्हणण्याची. ही पद्धत इथेही तंतोतंत लागू केली गेली. पण वेगळ्या स्वरूपात! सायरन वाजताच जमीनीवर कसे झोपायचे? पालथे पडायचे की उताने? डोळे झाकायचे की उघडे ठेवायचे? कान बंद करायचे की नाही? हात कुठे ठेवायचे? कानावर की आणखी कुठे? टेबल खाली वाकायचे, बसायचे, झोपायचे, पडून रहायचे की पलंगाखाली? आणि किती वेळ? हे सगळे वारंवार सांगण्यात आले. पण ते कशासाठी? पाकिस्तान भारतासोबत युद्ध करणार होता काय? की भारत पाकिस्तान सोबत? की दोघे एकमेकांविरुद्ध? तर असे काहीही होणार नव्हते. आपल्याच हद्दीत उभे राहून तिकडचे दहशतवादी अड्डे उद्धवस्त केले गेले. त्यासाठी भारतवासियांसमोर युद्ध होणार असा राईचा पर्वत उभा केला. पण संयुक्त राष्ट्र संघासह करार, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय नियम आणि विविध बंधनांसह अनेक गोष्टींचा युद्धात अंतर्भाव असतो, हे देश विसरून गेला काय? तर निश्चितच नाही. मग देशभर हे नाटक कशासाठी केल्या गेले? देशवासियांना वेठीस का धरले गेले? ऑपरेशन सिंदूर असे नाव का दिल्या गेले? या पाठीमागे सरकारचे काय मनसुबे आहेत? कोणते षडयंत्र आहे? भारतीय नागरिकांप्रती प्रधानमंत्री यांना एवढे प्रेम आणि आस्था आहे काय? ते देशातील सर्वधर्मीय भारतवासियांना आपले मानतात काय? मानतात तर मग ते परदेशातून येऊन सरळ पहलगाम इथे घटनास्थळी का गेले नाहीत? जखमी, मृत्यूमुखी पडलेल्या दु:खी परिवारातील सदस्यांना त्यांच्या घरी जाऊन का भेटले नाहीत? सरळ बिहार राज्यातील निवडणूक सभेसाठी का गेले? त्यांनी देशात पत्रकार परिषद बोलावून देश सुरक्षित हातात आहे चा संदेश का दिला नाही? देशाच्या सुरक्षेची हमी का दिली नाही? ही जबाबदारी 56 इंच छातीची आहे, असे छाती ठोकून का म्हटले नाही? ऑपरेशन सिंदूरच्या नावाखाली त्यांनी पुन्हा एकदा महिलांच्या कपाळावरील सिंदूर, टिकली, कुंकू घट्ट चिटकवली ती का? तिचा स्वर्ग तिच्या नवऱ्याच्या पायाखाली अशा बावळट मानसिकतेला बळकटी येईल, असे नाव धारण का केले? याचसाठी की, अशा आचरणातून पुन्हा पुरूषप्रधान संस्कृती पक्की होईल? याचसाठी की, अशा कृतीतून पुन्हा एकदा मनुस्मृती बळकट करायची? सिंदूरचा जाणीवपूर्वक नामोल्लेख करून ते महिलेच्या कपाळावर घट्ट चिटकवले, ते यासाठीच की, तिचा नवरा म्हणजेच तिचा सन्मान आहे, ही विचारसरणी तिच्या मनावर बिंबविण्यासाठी. तिचे कुंकू म्हणजे नवऱ्याची इज्जत, लाज आहे आणि हा माठ्या कितीही गल्ल्या फिरला तरी कुटुंबाची, घराण्याची, खानदानीची इज्जत नाही जाणार! हे पुन्हा एकदा समाजात अधोरेखीत करण्यासाठी आणि यात ते यशस्वी झाले आहेत. मुली-महिलांना स्वतंत्र अस्तित्व नाही. स्वतंत्र कर्तृत्व नाही. 'न स्त्री स्वतंत्र मर्हती ते अष्टवर्षात भवेत कन्या' या विकृत मानसिकतेकडे घेऊन जाणारा हा ऑपरेशन प्रवास आहे. ती नवऱ्याच्या कुंकवाची दासी. तिची ओळख म्हणजे कुंकू. ती सिंदूरची दासी. हेच तिचे सौभाग्य. हेच तिचे विश्व आणि हेच तिचे जीवन. हा विचार स्त्री पुरूष या दोघांच्याही मनात रुजविण्यात आणि फुलविण्यात ते या ऑपरेशन सिंदूरमधून यशस्वी झाले आहेत. आता येथून पुढे स्त्रीया, माझीच टिकली कशी उठावदार, माझीच टिकली किती सुंदर, किती शुभ, किती लाभ, किती पवित्र असा गर्व करत बसणार. असा आभिमान बाळगून नवऱ्याच्या कल्याणाचे, त्याच्या हिताचे सण वार, रिती, रिवाज, प्रथा, परंपरेत आणखी पारंगत होणार. स्वतःच्या विचाराचे आणि शरीराचे चिपाट होईपर्यंत त्यातच धन्यता माणणार. माझेच कुंकू कसे लालभडक! माझाच सिंदूर किती पवित्र! या आभिमानानाने मिरवत राहणार. पण ज्या महिला सिंदूर लावत नाहीत, त्यांचे काय? त्यांना ऑपरेशन सिंदूर या नावाचा फायदा काय? त्यांना तुमच्या या सिंदूर मोहिमेत कसे बसवणार? त्यांना या कृतीत कसे सामाऊन घेणार? विधवा आया बहिणींना कसे सामाऊन घेणार? त्यांचे संरक्षण कोण करणार? काय हे ऑपरेशन सिंदूर फक्त एकाच धर्मियांसाठी होते, की जे सिंदूर लावतात? काय हा देश सिंदूर लावणाऱ्यांचाच आहे? मग बाकी धर्मीय जे आपले देशवासी आहेत, त्यांचे काय? काय हे नाव सर्वसमावेशक आहे? की एकाच धर्माचे संरक्षण करणारे आहे? की एकाच धर्मियांची री ओढणारे आहे? की हे नाव कोण्या एका धर्मातील मतांची बेरीज करून त्यावर राजकीय पोळी शेकून घेण्यासाठी त्यांच्या भावनिक, आस्थेवर आधारित आहे? की फक्त हिंदू मते एकगठ्ठा मिळवण्याचे हे एक षडयंत्र आहे? असे अनेक प्रश्न भारतीय नागरिकांच्या मनात घोळत आहेत. त्याचबरोबर नागरिक हे सुद्धा बोलत आहेत की, प्रधानमंत्री जी, देशातील आया बहिणींच्या इज्जतीचे काय? मणीपूर मधील आया बहिणींना नग्न करून, त्यांच्या शरीरांची विटंबना करत करत, त्यांची छेड काढत, अवमान करत रस्त्यावरून पायी फिरवत आणि शेवटी त्यांच्यावर बलात्कार करून त्यांचा खून करून मृतदेह फेकून दिले, त्यावर ऑपरेशन सिंदूर करा. आज ही मणीपूर शांत नाही. ते अशांत आहे. भेदरलेले आहे. ते सुद्धा आपलेच बहीण भाऊ आहेत. ते सुद्धा आपलेच राज्य आहे. भारत देशाचाच भाग आहे, हे विसरू नका. प्रधानमंत्री जी, मणीपूरला एकदा तरी जाऊन या. बघा तिथेही माय बहिणी सिंदूर लावतातच. त्यांच्या कपाळावरचे सिंदूर उजडलेले आहे. तुमच्या भाषेत त्यांचेही कपाळ करंटे बनले आहे. हे एकदा तुम्ही बघून याच. त्यांच्या चेहऱ्यावरील हसू लोप पावले आहे. तो उदास चेहरा एकदा बघून याच. घरेदारे उद्वस्त झाली आहेत. त्यांच्याही कपाळावरचे सिंदूर देशातीलच जात्यांध आणि धर्मांध दहशतवादी - अतिरेकी मिटवत आहेत. त्यांच्यावर कोणते ऑपरेशन करणार? याची घोषणा करा. भारत देश हा जात्यांध आणि धर्मांध अतिरेकी, दहशतवाद्यांचा कारखाना नाही काय? यावर सत्य अशी मन की बात करा. अशा या आपल्याच देशातील अतिरेक्यांचा, दहशतवाद्यांचा खात्मा तुम्ही कधी करणार? यावर बोला. देशात सिंदूर लावलेल्या मुली-महिला अचानकच मोठ्या संख्येने बेपत्ता होत आहेत. त्या शोधून काढायला तुमच्या यंत्रणांना सांगा. त्या बेपत्ता होणार नाहीत, असे संस्कार देशाला द्या. देशातील जात्यांध, धर्मांध दहशतवाद्यांकडून आपल्याच देशातील मुली-महिलांवर अन्याय, अत्याचार, बलात्कार होत आहेत, खून होत आहेत. त्यांचे अपवित्र झालेले सिंदूर तुम्ही कोणती योजना आखून पवित्र करणार आहात? यावर बोला. त्यांना न्याय कोण देणार? कधी देणार? त्यांचे अश्रू कोण पुसणार? कधी पुसणार? अशा घटना देशातील जात्यांध आणि धर्मांध दहशतवाद्यांकडून आपल्याच देशवासिय आया बहिणींवर आणि भावांवर घडू नयेत, म्हणून तुम्ही कोणती कडक आणि धडक कारवाई करणार? याकडे देशाचे लक्ष लागले आहे. ■■



ॲड. सुभाष सावंगीकर
मो. 9325209492

# मानवी जीवनाच्या उत्कर्षाचा मार्ग




डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 14 ऑक्टोबर 1956 रोजी धर्मांतर घडवून आणले. दीक्षा देताना त्यांनी आपल्या अनुयायांना दीक्षाविधीचा भाग म्हणून बावीस प्रतिज्ञा दिल्या. 22 प्रतिज्ञा म्हणजे बुद्धीवादी समाज रचनेचा पाया! 22 प्रतिज्ञा म्हणजे धम्म! धम्म म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिप्रेत नितीमत्ता! 'बुद्ध आणि त्यांचा धम्म' या ग्रंथात विषद केलेल्या सदधम्माचे पालन करण्यासाठी आखून दिलेले नियम म्हणजे 22 प्रतिज्ञा होत. बौद्ध साहित्याच्या इतिहासात कुठेही न आढळणाऱ्या पण पाना पानावर जाणवणाऱ्या या 22 प्रतिज्ञा आहेत. धम्मदीक्षा प्रसंगी प्रतिज्ञा देतांना डॉ. बाबासाहेबांनी प्रत्येक प्रतिज्ञा ही वेगवेगळ्या कागदावर लिहिली होती. प्रत्येक पानावर एक याप्रमाणे 22 पानावर लिहिलेल्या प्रतिज्ञा लाखों अनुयायांनी ग्रहण केल्या. डोळ्यावर चष्मा असलेले डॉ. बाबासाहेब आपण सर्वत्र पाहतो. डॉ. बाबासाहेबांची हीच प्रतिमा आमच्या मन पटलावर आहे. परंतु 14 ऑक्टोबर 1956 रोजी 22 प्रतिज्ञा देतांना डॉ. बाबासाहेबांनी डोळ्यावर चष्मा लावलेला नाही. (पहा, दीक्षाभूमी स्तूपातील फोटो) प्रतिज्ञा ग्रहण करतांना चष्म्याचा सुद्धा अडथळा नसावा अशी त्यांची भूमिका होती.

22 प्रतिज्ञांमुळे अन्य धर्मियांच्या भावना दुखवल्याचा नेहमी आक्षेप असतो. परंतु प्रत्येक प्रतिज्ञेची सुरुवात स्वत:पासून म्हणजे 'मी' या शब्दाने केली आहे. त्या स्वतः आचरणात आणण्यासाठी आहेत. त्यामुळे अन्य कुणाच्या भावना दुखावण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. इतरांनी काय करावे, काय करू नये हा ज्याचा त्याचा प्रश्न आहे. पूर्वी बौद्ध धम्माची दीक्षा भिक्खूंच्या हस्ते घेण्याचा प्रघात होता. 1956 च्या दीक्षा प्रसंगी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या प्रथेत बदल केला आणि 'दरेकाने दरेकाला दीक्षा देण्याचा' नियम बनवला. परंतु दीक्षा देणारा उपासक 22 प्रतिज्ञांचे पालन करणारा असावा असे अपेक्षित होते. या प्रतिज्ञा केवळ बौद्धांसाठी नसून, अन्य धर्मियांनी त्याचे पालन केल्यास त्यांच्यातील अंधश्रद्धा, दुराचार, अवैज्ञानिकता दूर होण्यास मदत होते. संविधानातील अनुच्छेद 51 प्रमाणे प्रत्येकाने वैज्ञानिक दृष्टीकोण वाढविण्याचा उल्लेख आहे. संविधानानुसार विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी, विज्ञानवाद वाढवण्यास या प्रतिज्ञा शालेय अभ्यासक्रमात असाव्या हे अपेक्षित आहे. तेव्हाच समाज व देश विज्ञानवादी बनेल. 22 प्रतिज्ञा मधील सुरुवातीच्या 1 ते 8 प्रतिज्ञा अज्ञान, अवैज्ञानिकतेला मूठमाती देणाऱ्या आहेत. त्या द्वारे ब्रम्हा-विष्णू, महेश, राम-कृष्ण, गौरी-गणपती अशा काल्पनिक देवी देवतांना एका क्षणात आपल्या जीवनातून हद्दपार केल्या आहेत. या देवी देवतांना पोषक असणारा अवतारवाद, श्राद्धपक्ष, पिंडदान या कुप्रथांना 1 ते 8 या प्रतिज्ञातून कायमची सोडचिठ्ठी दिली आहे. याच कर्मकांड जोपासणाऱ्या ब्राम्हणवादाला 8व्या प्रतिज्ञेतून हद्दपार केले आहे. 'मी कोणतेही क्रियाकर्म ब्राह्मणांच्या हातून करवून घेणार नाही' या प्रतिज्ञेद्वारे ब्राह्मण्यवादाचा अडथळा कायमचा दूर झाला आहे.

9 आणि 10 व्या प्रतिज्ञेत सर्व मनुष्यमात्रातील समानतेला महत्व देण्यात आले आहे. बुद्धाने सांगितलेली समता आणि त्याचे पालन करण्याची जबाबदारी या प्रतिज्ञेत अंतर्भूत आहे. 11 ते 17 या प्रतिज्ञा पंचशील आणि अष्टांगिक मार्गाचे पालन करण्याचे स्मरण करून देत आहे. 'पाणातीपाता वेरमणी' अर्थात कोणत्याही प्रकारची प्राणीहत्या न करण्याची प्रतिज्ञा आहे. 13 व्या प्रतिज्ञेत सर्व प्राणिमात्रांवर दया करण्याचा उपदेश आहे. आज विविध धर्मात गुन्हेगारी, बलात्कार, बेरोजगारी, मॉब लिंचिंग, हिंसा यासारखे प्रकार वाढले आहेत. त्याचे एकमेव कारण म्हणजे पंचशील, अष्टांगिक मार्गाचे उल्लंघन होय. म्हणून देशालाच काय तर जगालासुद्धा बुद्ध तत्वज्ञानाची आवश्यकता आहे. त्यामुळे जगाला युद्धाची नव्हे तर बुद्धाची आवश्यकता असल्याचे म्हटले जाते. या तत्वज्ञानाच्या जोरावर जगातील अनेक देशांनी बौद्ध धम्माला स्वीकारले आहे. 18 व्या प्रतिज्ञेत बुद्धाची प्रज्ञा, शील आणि करुणा सांगितली आहे. प्रज्ञा म्हणजे सम्यक दृष्टी, सम्यक संकल्प होय. माणूस प्रज्ञावान असू शकतो, परंतू तो शीलवान नसेल तर तो लोकहिताचे कार्य करू शकत नाही. म्हणून प्रज्ञेसोबत शील आवश्यक म्हटले आहे. प्रज्ञा म्हणजे शहाणपण आणि शील म्हणजे व्यक्तीचे चारित्र्य! डॉ. बाबासाहेब म्हणतात, 'विद्येसोबत माणसात शील अनिवार्य असले पाहिजे. शीलाशिवाय विद्या फुकाची आहे. बुद्धीला सदाचाराची, शीलाची जोड मिळाली तर तो लबाडी अगर फसवेगिरी करू शकणार नाही. म्हणून प्रत्येकांना शील पालनाची अत्यंत गरज आहे. शील शिवाय शिकले सवरले लोक निपजू लागले तर त्यांच्या शिक्षणातच समाजाचा व राष्ट्राचा नाश आहे. तेव्हा शीलची शिक्षणापेक्षा किती अधिक किंमत आहे हे तुमच्या ध्यानी आले असेलच आणि म्हणून प्रत्येक इसमात प्रथम शील असले पाहिजे.' असे डॉ. बाबासाहेब म्हणतात. 19 व्या प्रतिज्ञेत जुन्या, मनुष्यमात्राच्या उत्कर्षाला हानीकारक असणाऱ्या हिंदू धर्माचा त्याग सांगितला आहे. ही प्रतिज्ञा घेतांना डॉ. बाबासाहेबांचा गळा भरून आला होता. क्षणभर थांबून स्वतःला सावरत डॉ. बाबासाहेब म्हणतात, मी एकदाचा हिंदू धर्माच्या नरकातून सुटलो आहे, हिंदू धर्माचा त्याग करून मला अत्यानंद झाला आहे. 20 व्या प्रतिज्ञेत बौद्ध धम्म हा सदधम्म असल्याची खात्री दिली आहे. अधम्म, सदधम्माची विस्तृत माहिती डॉ. बाबासाहेबांनी 'बुद्ध आणि त्यांचा धम्म' या मौलिक ग्रंथात दिलेली आहे. 21 व्या प्रतिज्ञेत 'आज माझा नवा जन्म होत आहे असे मी मानतो.' या प्रतिज्ञेत डॉ. बाबासाहेबांनी पुनर्जन्म या शब्दाला कटाक्षाने टाळले आहे. नवा जन्म म्हणजे एका अवस्थेतून दुसऱ्या अवस्थेत स्थित्यंतर करणे होय. माणसाचे विचार, मूल्ये आणि आचरणात परिवर्तन म्हणजे नवा जन्म होय. त्यामुळे आमचा वैचारिक जन्म 14 ऑक्टोबर 1956 रोजी झाला आहे, असे म्हणणे चूक ठरणार नाही. 22 व्या प्रतिज्ञेत इत:पर मी बुद्ध धम्माच्या निर्देशानुसार आपले आचरण करणार हे स्पष्ट केले आहे. एकंदरीत धर्मांतराच्या प्रसंगी दिलेल्या 22 प्रतिज्ञा या (Reconstruction of Society) सामाजिक पुनर्रचना करणाऱ्या आहेत. बौद्धांमध्ये घडून आलेले परिवर्तन त्याचाच परिपाक आहे. 9 ऑगस्ट 2022 रोजी आप चे सामाजिक न्याय मंत्री राजेंद्र पाल गौतम यांनी दहा हजार लोकांना बौद्ध धम्माची दीक्षा दिली होती. त्या वेळी त्यांनी धर्मांतरीत बौद्धांकडून 22 प्रतिज्ञा वदवून घेतल्या होत्या. वास्तवात 22 प्रतिज्ञा चा उल्लेख करणे हे संविधानप्रणीत अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा भाग आहे. ती काळाची गरज आहे. परंतु आमच्या 33 कोटी देवी देवतांचा अपमान केल्याची ओरड भाजप आणि सनातन्यांनी केली होती. आप चे सर्वेसर्वा अरविंद केजरीवाल हे आपल्या कार्यालयात डॉ. बाबासाहेबांचा फोटो लावत होते. परंतु 22 प्रतिज्ञा मुळे राजेंद्र पाल गौतम यांना मंत्रीपद त्यागण्यास त्यांनी बाध्य केले. अर्थात त्यांनी डॉ. बाबासाहेबांच्या विचारांना नाकारले. राजेंद्र पाल गौतम यांनी जणू खूप मोठी चूक केली असा ढिंढोरा पिटण्यात आला. वास्तवात राजेंद्र पाल यांची चूक असेल तर सरकारने दीक्षाभूमीवर 22 प्रतिज्ञाचा स्तंभ का उभारला? महाराष्ट्र शासनाने प्रकाशित केलेल्या 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर राईटिंग अँड स्पीचेस' मध्ये 22 प्रतिज्ञाचा समावेश का केला? इस्लाम, ख्रिश्चन, बौद्ध, शीख हे हिंदूंच्या देवी देवतांची पूजाअर्चा करत नाहीत. अर्थात ते अप्रत्यक्षपणे 22 प्रतिज्ञाचे अनुसरण करत आहेत. मग त्यांना दोषी ठरवणार काय? ही चूक असेल तर प्रतिज्ञाचे पालन करणाऱ्या व्यक्तीच्या मतासाठी निवडणूकीत आग्रह का धरता? 22 प्रतिज्ञामुळे आमच्या भावना दुखवल्या म्हणणाऱ्यांनी एक बाब लक्षात घेतली पाहिजे की जैन, बौद्ध, मुस्लीम, शीख, ख्रिश्चन हे हिंदूंच्या देवी देवतांची पूजा करत नाही, म्हणून ते सर्व नरकात जाणार आहेत काय? किंवा हिंदू लोक अल्लाह ला भजत नाहीत, म्हणून ते जहन्नूममध्ये जातील काय? हजारो वर्षापासून कोट्यावधी अस्पृश्यांवर लादलेली जातीयता, गुलामी, अन्याय अत्याचार व शोषण हे सर्व नरकीय नव्हते काय? एकंदरीत बावीस प्रतिज्ञा या मानवी जीवनाच्या उत्कर्षाचा मार्ग असून त्याचा प्रचार प्रसार करणे प्रत्येक बौद्धांचे कर्तव्य आहे. ■■



श्रीराम बनसोड,
8208617748

# मेरे प्यारे सुन्दर भारतपर : दुश्मनकी नजर ना लगे...

## अरे तू सुन!

मित्रांनो माझे बालपण आणि जन्म नागपूरच्या टीमकी-भानखेडा येथे गोळीबार चौक आणि मोमीनपुरा जवळील हाकेच्या अंतरावर झाले. पाहिला वर्ग शिकत असतानाच हा परिसर सोडून विश्वकर्मा नगरच्या स्वमालकीच्या घरात वास्तव्याला आलो. पण या परिसराची नाळ कधीच तुटली नाही. माझे बाबा कर्मश्री दुर्गादासजी रक्षक यांच्या व्यवसायाची आणि सामाजिक जीवनाची सुरवात याच 'मोहल्यातून' कारण मोहल्ला-पुरा हे शब्द तेव्हा खुप परिचीत होते. कालांतराने वसाहतींना नगर, अपार्टमेंट, स्कीम नावाने ओळखल्या जाते. टीमकी-भानखेडा वसाहत दाटीवाटीने एकमेकाला लगट करून आहे. तेलीपुरा, कोष्टीपुरा, खाटीकपुरा, चंभारपुरा, मांगपुरा, कलारपुरा त्यात महारपुरा अशा वसत्या आपली संस्कृती जपत गुण्यागोवींदाने नांदायच्या. हाकेवर असलेला मोमीनपुरा हातात हात घालून आर्थिक व्यवहारात सहकार्य करायचा. मोमीनपुऱ्याचे हकीम यांच्या आयुर्वेद औषधी जात-धर्म पाळत नव्हत्या. कोष्ट्यांचे मांगठे श्रीमंतीचा रूबाब दाखवायचे. याच वस्त्यांमध्ये कर्मश्री दुर्गादासजी रक्षक श्री गुरूदेव सेवा मंडळ शाखा भानखेडा माध्यमातून राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या विचार प्रसाराचे काम करायचे. सायंकाळच्या सामुदायिक प्रार्थनेला लहान बालक आणि तरूणांची गर्दी असायची. सोबत मल्लखांब, दांडपट्टा, लाठी प्रशिक्षण चालायचे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी अनेकदा टिमकी-भानखेडा शाखेला भेट देऊन भजन भाषणाचे जाहीर कार्यक्रम केलेत. या दिवसात आजच्या सारखा डीजे, पेनड्राईव्हचा जमाना नव्हता. तेव्हा एचएमव्ही कंपनीच्या काळ्या रेकार्ड (तबकड्या) त्यातील गाणे वाजायचे. याच कंपनीने राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांची काही भजने त्यांच्याच आवाजात रेकार्डींग केलेली त्याकाळात जनमाणसावर प्रभाव करून होती. माझे बालपण खुप समजण्याचे वय जरी नव्हते. पण राष्ट्रसंतांच्या आवाजातील एक भजन माझ्या मनात त्याकाळात राष्ट्रभक्ती जागृत करून गेले. ते भजन राष्ट्रसंतांनी सौंसर मध्यप्रदेश येथील चातुर्मास्य शिबीरात 11-10-1961 ला लिहून प्रथम गायले. ते भजन होते,

*'मेरे प्यारे सुन्दर भारत पर - दुष्मनकी नजर ना लगे अरे तू सुन!'*

हे भजन मुर्दाड मनांना जात-पात-धर्मा पलीकडे माझे राष्ट्र, माझी राष्ट्रभक्ती कशी असावी यावर चिंतन मांडत होते. शिक्षणाचा मोठ्या प्रमाणात अभाव पण श्रमिक वस्त्या मात्र राष्ट्रभक्तीने जागृत होत्या. राष्ट्रसंत या भजनात लिहतात -

*मेरे प्यारे सुन्दर भारत पर-दुश्मनकी नजर ना लगे अरे तू सुन ।*
*भारत की इस आजादी पर-परदेशी नजर ना लगे, अरे तू सुन ॥*

मित्रांनो देश 15 ऑगस्ट 1947 ला स्वतंत्र झाला. मग राष्ट्रसंतांना या देशाच्या स्वातंत्र्याचे भवितव्य धोक्यात आहे असे अल्प काळातच वाटत असावे का? ते याच भजनात लिहतात -

***मुष्किल से पाया है स्वराज । प्रिय बापूका है सिरताज ॥***
***कई वीरोंने कुर्बानी कर-सुख के दीन बतलाये आज ॥***

मित्रांनो भारताच स्वातंत्र्य आपल्याला सहज मिळालेले नाही. अनेकांची कुर्बानी या स्वातंत्र्याच्या मागे असल्याची जाणीव राष्ट्रसंत करून देतात. पुढे ते भारताच्या सभोवताल असलेले देश आणि साम्राज्यवादी देशांना ठणकावून सांगतात -

***हम न किसीको डरायेंगे । ना किनसे डर पायेंगे ॥***
***सबको मित्र बनाने में हम-अपना हाथ बटायेंगे ॥***

आम्ही मानवतेच्या विचाराचे, विश्वशांतीला मानणारे आहोत. याचा अर्थ असा नाही भारतावर कोणीही वाकडी नजर टाकली तर त्यांच्याशी मुकाबला करण्याची ताकत आमच्यात नाही? ती देशभक्ती आमच्यात नेहमीच जागृत आहे. राष्ट्रसंतांनी भारताबाहेरच्या विदेशी शक्तींना जसे धमकावले ते भारतातील अतंर्गत दुश्मनांना पण ठणकावतात, कारण शत्रुशी लढणे सोपे असते राष्ट्रसंत लिहतात -

***लुचपत खोरी हम न करें । झूठ मिलावट दूर करें ॥***
***सच बातों पर हम जीये-पिछडी जाती को साथ करें ॥***

भारत कमजोर कुठे आहे त्या मानसिकतेवर वर्मावर राष्ट्रसंतांनी प्रहार करीत देशाअंतर्गत घुसखोरांना सावध केले, की भ्रष्टाचार तसेच खोट बोलून सामाजिक आरोग्य आपण नासवता, भेसळ वस्तु विकून आपण शारीरिक आरोग्य कमकुवत करता. यामुळे भारत भविष्यात कमजोर देश म्हणून जगासमोर उभा राहू नये? असा उपदेश करतात. त्यापुढे राष्ट्रसंत लिहतात, भारताचे खरे धन काय आहे?

***'चरित्र' भारत का है धन । विशाल भारत का है मन ।***
***कहता तुकड्या, नया जमाना-नव-निर्माण करेंगे हम ॥***

मित्रांनो भारतीयांचे खरे धन मानवी मूल्याच चारित्र्य आहे. 'सत्य मेव जयते' आहे. राष्ट्रसंतांनी जेव्हा भजन लिहिले तेव्हा आमच्या देशाच्या प्रगतीची पाऊलवाट निर्माण करणे सुरू होते. एकीकडे नैसर्गिक दुष्काळाचे थैमान सुरू होते. अन्नधान्याचा तुटवडा भयंकर होता. कृषी क्षेत्रातली आमची अल्पकाळातील भरारी, विज्ञानाची साथ अन्नधान्याची स्वयंपूर्णता सिद्ध करून गेली. आज मात्र अन्नाचा



नासोडा आम्ही उघड्या डोळ्यांनी पाहतो आहे. 1962 चायना युद्ध आमच्या आर्थिक प्रगतीला खिळ घालून गेले. 1965 ला पाकिस्तानला मुहतोड जवाब दिला. 1972 ला तत्कालीन प्रधानमंत्री इंदिरा गांधी यांनी आपल्यातल्या रणांगणीचा अवतार सर्व जगाला दाखवत, पाकिस्तानची कंबर मोडत, जुलमी गुलामशाहीतून बांगला देशला मुक्त केले. विज्ञानाच्या माध्यमातून अनेक अविष्कार भारताने घडवले. उंच आकाशात झेप घेत मंगळ गाठले. शैक्षणिक क्षेत्रात प्रचंड प्रगती करीत जगाला भारतीय सुसंस्कृत विद्यार्थी दिलेत. जे आज मोठ्या प्रमाणात जगाच्या तंत्रज्ञानाला चालवत मानवी जनजीवन उंचावत आहे. या सर्व भारतीय प्रगतीच्या पाऊलवाटा महामार्ग बनत असतांनाच, भ्रष्टाचाराने, जाती, धर्माच्या द्वेषाने, तसेच विदेशी गुलामगीरीने आणि संस्कृतीने प्रगतीच्या महामार्गात मोठमोठे अडथळे आम्हीच निर्माण केले. ज्या शेतकरी मायबापाने कृषीक्रांती करून अन्नधान्य पिकविले, त्याच्या बनियानाचे भोक अजून मोठे होत त्याला आत्महत्या करायला भाग पाडत आहे. महाप्रसादाच्या रांगा शालेय शिक्षणापासून वाढत मोफत धान्य मिळावे म्हणून राशनिंग दुकानापर्यंत पोहोचल्या. करोडो कुटुंबाना मोफत धान्य, घरकुल बांधायला मदत, संडास बांधायला मदत हे कुठल्या स्वाभिमानी भारताचे लक्षण आहे? धार्मिक स्थळे हा प्रत्येक धर्माच्या आस्थेचा भाग आहे. लोकवर्गणीतून धार्मिक स्थळे आजपर्यंत उभारल्या जायची. धार्मिक कार्यक्रम लोकवर्गणीतून घडायचे. पण राजकीय स्वार्थासाठी धार्मिक स्थळांसाठी आज शासनाकडे मोठे बजेट असते. शाळेचे शिक्षण खिचडीत अडकत सातव्या-आठव्या वर्गात शिकणारा विद्यार्थी मराठी पहिल्या वर्गाच्या पुस्तकातील साधी कविता वाचु शकत नाही. या तरूण पीढीचे सामाजिक भविष्य काय? शासकीय आरोग्याच्या दवाखान्यात रूग्णांच्या ऑपरेशनच्या रांगा तीनचार महिन्याच्या तारखांमध्ये अडकलेल्या आहेत. खाजगी दवाखाने मोठ्या प्रमाणात कसाईखाने म्हणून रोज चर्चेला येत आहे. चॅरेटीचे नाव सांगत शासनाची आणि जनतेची फसवणूक होतांना आमच्या दंगली कधी घडत नाही? अन्यायाची चीड आता फक्त शब्दात मर्यादीत आहेत. भारतीय लोकशाही खोट्या आश्वासनावर टिकून आहे. उद्याच्या युवा भारताचे स्वप्न पाहत आज बापदादांच्या मिळकतीवर मोठा युवा जगतो आहे. रोजगार म्हणजे शासकीय नोकरी, श्रम कमी पगार आणि सुखसोयी जास्त या कल्पनेत मोठा तरूण वर्ग अडकलेला आहे. व्हॉटसप, फेसबुक, इस्टाग्राम, व्टीटर, दूरदर्शन अशा प्रसार माध्यमातून प्रसारीत होणाऱ्या बातम्या, यावरची चर्चा, आमच्या सर्व समस्यांचा वीसर पाडायला मदत करत आहे. दूरदर्शन मालिका आमच कौटुंबीक नातच नासवत आहे. अश्लिलता मोबाईलमधून सर्व स्थरातील लोकांना दिसते. त्या अश्लिलतेचा अतिरेक अनैतिक संबधात वाढतो आहे. बलात्काराच्या घटनांना आम्ही तरूण पीढीला दोषी ठरवतो आहे. मोबाईलमधून तरूण मनात घुसणारी अश्लिलता थांबवायला शासनाकडे कुठलीच यंत्रणा कशी नाही? आग सर्वदूर लागलेली आहे. महापुरूषांच्या जयंत्या-पुण्यतिथ्या मनोरंजनात अडकून जाती-धर्माच्या रंगात वाटल्या जात आहे. समाज व्यक्तीपूजक होतो आहे विचारपूजक केव्हा होणार? ■■



ज्ञानेश्वर दुर्गादास रक्षक
मो. 9823966282

## वाचकांचे विचारपिठ

बहुजन सौरभ

### शिक्षणात शस्त्रांपेक्षा जास्त शक्ती आहे.

जॉर्ज मॅकलॉरिन या मुलाने 1948 मध्ये ओक्लाहोमा विद्यापीठात प्रवेश घेतला होता. तो त्या विद्यापीठात पहिला अश्वेत विद्यार्थी होता. त्याला त्याच्या सहकारी विद्यार्थ्यांपासून दूर एका कोपऱ्यात बसावे लागत असे. तो बुद्धीने अत्यंत हुशार होता आणि तो नेहमी कॉलेजमधील पहिल्या तीन विद्यार्थ्यांपैकी एक म्हणून गुणवत्ता यादीत येऊ लागला. तो म्हणतो, 'काही सहकारी विद्यार्थी माझ्याकडे असे पाहत असत, जसा मी एक प्राणी आहे, जनावर आहे. कचऱ्यातील वस्तू आहे. कोणीही माझ्याशी बोलत नसे, संबंध ठेवत नसत. शिक्षकांसाठी मी कोणताही खिजगिनतीत नव्हतो. माझे वर्गामध्ये अस्तित्वच नव्हते. ते शिक्षक माझ्या प्रश्नांची क्वचितच उत्तरे देत असत. मी स्वतःला इतके अभ्यासात झोकून दिले की मी गुणवत्ता यादीवरच्या क्रमांकावर आपली जागा मिळवली. तेव्हा त्या बाकी विद्यार्थ्यांना माझ्याबद्दल विचार करावा लागला. ते माझा शोध घेऊ लागले आणि शिक्षकांना मला विचारात घेणे भाग पडले. तेव्हा त्यांना मला आपल्यासोबत मैत्री आणि संबंध ठेवण्यास सुरवात केली. शिक्षक माझ्याकडे आवर्जून लक्ष द्यायला लागले. हे सर्व माझ्या आयुष्यात शिक्षणामुळे शक्य झाले. 'शिक्षणात शस्त्रांपेक्षा जास्त शक्ती आहे.'

– सुनिल भगत

# संघनायक डॉ. भदंत सावंगी मेधंकर



प.पू. डॉ. भदन्त सावंगी मेधंकरजी

पुर्वोत्तर भंडारा जिल्ह्यातील व संध्याच्या गडचिरोली जिल्ह्यात गोंदिया जिल्ह्याच्या शेजारी वैनगंगेच्या काठांवर असलेल्या सावंगी या गावी गोदाबाई आणि फुकाजी मेश्राम यांच्या कुटुंबात जन्मलेल्या माधव या मुलाचा जन्म झाला. विद्यार्थी अवस्थेत असताना प्राथमिक शिक्षण पूर्ण झाल्यावर आध्यात्मिक ओढ असलेल्या माधवरावानी पुर्वोत्तर संस्कृतीनुसार किर्तनकार भीष्माचार्य महाराज यांच्या शिष्यत्व स्विकारले होते. गावोगावी जाऊन आध्यात्मिक कीर्तन करु लागले. कालांतराने 1956 ला नागपूर येथे झालेल्या न भुतो न भविष्यती अशा धम्म दीक्षा सोहळ्याच्या माध्यमातुन परंपरा गत जुण्या धार्मिक विधी पासुन दुर होऊन नव्याने प्राप्त झालेल्या बुद्ध धम्माकडे कल वाढत चालला होता. माधवरावाच्या मनात वैराग्य निर्माण झाले. 1957 ला सारनाथ येथे जाऊन महाबोधी सोसायटी ऑफ श्रीलंका च्या सानिध्यात काही काळ बौद्ध धम्म विषयक संस्कार अभ्यास शिकण्याचा प्रयत्न केला. काही दिवसांनी भिख्खू इन्चार्ज भदन्त शासनश्री यांच्या हस्ते श्रामनेर पब्बज्जा घेऊन 1958 ला उपसंम्पदा घेऊन भिक्खु मेधंकर हे नाव धारण केले. धम्मक्राती नंतर 1956 प्रथम बौद्ध भिक्खु होण्याचा मान प्राप्त केला होता. काही दिवसांनी आंतरराष्ट्रीय कीर्ती प्राप्त विद्वान डॉ. भदंत आनंद कौसल्यायन यांच्या संपर्कात सेवा करत असताना त्यांनी आपल्या सोबत श्रीलंका येथील विध्यालंकार परिवेण येथे हिंदी विभाग प्रमुख म्हणून नेमणूक 5 झाल्यावर श्रीलंका येथे घेऊन गेले व तिथे त्यांनी भिक्खु मेधंकर यांना शिक्षणासाठी प्रवृत्त केले. आध्यात्मिक गोडी असलेल्या व वर्तमान काळात मिळालेल्या संधीचे सोने करण्यासाठी त्यांनी जिवापार मेहनत घेतली. बौद्ध धम्माच्या दृष्टीने त्यांना लाभलेल्या ग्रंथ साहित्य आणि संस्कृती सह विद्वानांनी केलेल्या मार्गदर्शनाचा उपयोग करून भदंत सावंगी मेधंकर यांनी दहा वर्षे तिथे वास्तव्य करून प्रगल्भता प्राप्त केली. अनेकानेक ज्ञान विज्ञान चिंतन मनन लेखन आदींच्या सहाय्याने त्यांनी मायदेशी परत येऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी धम्मक्राती केली त्या दीक्षाभूमी मध्ये डॉ. भदंत आनंद कौसल्यायन यांच्या सानिध्यात सेवारत असतांना त्यांच्या समग्र कार्याचे अभिन्न सहकारी म्हणून कार्य केले मग दीक्षाभूमी मध्ये श्रीलंका येथुन आनलेले बोधिवृक्ष लावने भिक्खु निवास चंद्रमणी कुटी उभारणे दीक्षाभूमी पाक्षिक चालविणे. डॉ. भदंत आनंद कौसल्यायन यांचे साहित्य ग्रंथ प्रकाशन कार्यात त्यांचा सहभाग होता. एक प्रकारे पुज्य डॉ. भदन्त आनंद कौसल्यायन यांच्या उतार वयात काठी रुपी आधार देत होते. भारतात आल्यावर भारतीय ज्ञानपीठ ने त्यानी संपादित केलेल्या सिंहल कहानिया हे पुस्तक 1967 मध्ये प्रकाशित केले. भिक्खु सावंगी मेधंकर यांचे साहित्य क्षेत्रात पदार्पण झाले 1967 ते 1992 पर्यंत दीक्षाभूमी येथे निवास करित असताना डॉ. भदंत आनंद कौसल्यायन यांच्या समवेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नंतर गावखेड्यात देशाच्या कानाकोपर्यात जाऊन धम्म प्रचार प्रसार करण्यात भदन्त सावंगी मेधंकर यांचा सहभाग होता. याच कालावधीत त्यांनी जबलपूरमधील विद्यापीठ येथे पि एच डी प्राप्त केली. 1972 मध्ये त्यांनी संपादित केलेल्या सम्राट अशोक या पुस्तकाचे प्रकाशन भारत सरकारने केले. धम्म क्रांती ला गतिमान करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संकल्पनेतील प्रबुद्ध भारत निर्मितीसाठी आंतरराष्ट्रीय ख्याती चे बौद्ध विद्वान व बहुआयामी व्यक्तिमत्त्व असलेल्या डॉ. भदन्त आनंद कौसल्यायन यांच्यासोबत बौद्ध प्रशिक्षण संस्थान स्थापन करून त्यांच्या माध्यमातुन बौद्ध साहित्य संस्कृती संवर्धन व भीक्खु प्रशिक्षण आदी उपक्रम राबविण्याच्या उद्देशाने विविध उपक्रमांचा अवलंब करण्यात भदंत सावंगी मेधंकर यांचा उल्लेख नाकारतां येत नाही. त्यासाठी 1978 ला राहुल बाल सदन ची स्थापना बुद्धभुमी प्रकाशन डॉ. भदन्त आनंद कौसल्यायन बुक डेपो बुद्धभुमी महाविहार परियोजना आदीना आकार देण्यासाठी परिश्रम घेऊन कार्य करीत असताना ऐशिया के महान बौद्ध सम्राट या पुस्तकाचे सारंग प्रकाशन नागपूर च्या वतीने प्रकाशित केले. 5 जानेवारी 1985 ला बुद्धभुमी येथे बुद्ध विहार आणि मुर्ती स्थापना पुज्य पावन दलाई लामा यांच्या हस्ते डॉ. भदन्त आनंद कौसल्यायन यांच्या 80 व्या जन्मदिन निमित्त आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमाला यशस्वी साकारले. 1987 ला त्यांनी आपला वर्षावास हा थायलंड ला केला होता. 1991 ला भारत सरकारने आयोजित केलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर जन्मशताब्दी महोत्सव समिती चे सदस्य होते. 1992 ला ते जपान ला गेले. ते आल इंडिया भीक्खु सघ बुद्धगया चे राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्य व विदेश सचिव म्हणून जबाबदारी पार पडली. 1995 ला तायवान येथे आयोजित जागतिक बौद्ध परिषदेत सहभागी होते. 1999 ला तायवान मलेशिया सिंगापुर थायलंड ला गेले. भिक्खु संघाचे संघनायक म्हणून त्यांनी भिक्खु संघाला मजबूत करण्यासाठी प्रयत्न केले. 5जानेवारी 2001 ला बुद्धभुमी महाविहार येथे थायलंड येथुन आलेल्या आदमकद बुद्ध मुर्ती स्थापना केली त्यांनी पुज्य डॉ. आनंद कौसल्यायन यांचे जिवन चरित्र लिहिले तसेच बुद्ध पुत्र की गाथा वैनगंगा के किनारे हे स्वताचे जिवन चरित्र लिहिले. बुद्धभुमी प्रकाशन च्या वतीने त्यांनी डॉ. भदन्त आनंद कौसल्यायन यांचे अनगिनत पुस्तकाचे प्रकाशन कार्यात स्वतःला झोकून दिले होते. किडनी च्या आजारामुळे त्रस्त असताना राहुल बाल सदन च्या अनाथांची आई असलेल्या सुश्री विमलताई आडे यांनी किडनी दान केली. बालसदन चे व्यवस्थापन सांभाळणारे काशिनाथ मेश्राम आणि बालसदन मध्ये लहानाचे मोठे झालेल्या ज्ञातअज्ञात आजी माजी विद्यार्थी व विद्यार्थिनी यांनी अत्यंत मेहनतीने सहायता केली. दिनांक 10 मे 2001 ला त्यांचे निधन झाले. धम्मदुत अनागारीक धर्मपाल आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नंतर डॉ. भदन्त आनंद कौसल्यायन यांच्या धम्म प्रचार प्रसार कार्यात सहभागी डॉ. भदन्त सावंगी मेधंकर यांनी कर्तव्यदक्ष राहुन आपले जीवन समर्पित केले त्यांच्या 25 व्या पुण्यस्मरण निमित्ताने त्याना अभिवादन. ■■



भदन्त नाग दिपंकर थेरो
मो.94236 05550

## मोक्ष

त्याने एका संताला विचारले, 'महाराज! मोक्ष अन् मृत्यूमध्ये काय फरक आहे? मोक्ष कुणाला मिळतो?' त्यावर ते म्हणाले, 'शास्त्र असे सांगते जर श्वास संपले पण इच्छा शिल्लक राहिल्या असतील तर तो मृत्यू आहे, याउलट श्वास शिल्लक आहेत पण सर्व इच्छा संपल्या तर तो मोक्ष. आपल्या आयुष्यातील खरी संपत्ती म्हणजे वेळ आणि श्वास. पण हे विशिष्ट प्रमाणातच आपल्यासाठी उपलब्ध आहेत. त्याचा कसा वापर करावा हे आपल्या हातात आहे. माणसाच्या इच्छांना काहीही मर्यादा नाहीत. सहजासहजी त्या संपत नाहीत. या इच्छा पूर्ण करण्याच्या नादात माणूस त्याच्याजवळ असणाऱ्या सुखापासूनही वंचित राहतो. आरशात मुख अन् संसारात सुख जरी दिसत असले तरी ते प्रत्यक्षात मात्र नसते. इच्छा या मृगजळासारख्या असतात. त्यांच्या मागे धावता धावता आयुष्याची वेळ केव्हा संपून जाते हे कळतच नाही. तुच मला सांग की, आपल्या सभोवताली असणाऱ्या व्यक्तीपैकी कितीजण आनंदाने हसतात? हल्ली हसणेही दुर्मिळ झाले आहे. माणसे प्रत्यक्षात तेवढे हसत नाहीत जेवढे छायाचित्रात हसताना दिसतात. मृत्यू हा त्याची वेळ आली की स्वतःहून न चुकता हजर होतो. पण, मोक्षाचे मात्र तसे नाही. त्यासाठी आवश्यक असणाऱ्या गोष्टींची पूर्तता केल्याशिवाय तो कुणालाही भेटत नाही. लक्षात ठेव! मनातील सर्व इच्छा आकांक्षांचा त्याग करणे एवढे सोपे नाही. म्हणूनच प्रत्येकालाच मोक्ष मिळत नाही. सृष्टीचा हा नियम आहे की, काहीतरी हवे असेल तर त्यासाठी काहीतरी द्यावे लागते. त्याचे मूल्य चुकवावे लागते. मूल्य दिल्याशिवाय तर श्वाससुद्धा मिळत नाही. दुसरा श्वास तुम्ही तेव्हाच घेऊ शकता जेव्हा पहिला श्वास सोडता. मोक्षप्राप्तीसाठी कोणताही वशिला चालत नाही किंवा लाचही स्वीकारल्या जात नाही. परमेश्वराच्या दरबारात प्रत्येकाचा हिशेब फार अचूकपणे लिहिलेला असतो. तेथे प्रत्येक व्यवहार पारदर्शी असतो. बनवाबनबी हा प्रकार मुळीच चालत नाही. कुणीतरी फार छान ओळी लिहिल्यात... हकीकत रूबरू हो तो, अदाकारी नहीं चलती खुदा के सामने बंदों की, मक्कारी नहीं चलती तुम्हारा दबदबा खाली तुम्हारी जिंदगी तक है किसी की कब्र के अंदर, जमींदारी नहीं चलती। ■■

## अनंतायन



ॲड. अनंत खेळकर
मो. 9370061677

# गुढवादातून विज्ञानवादाकडे

**माणसाच्याच नव्हे पृथ्वीच्याही निर्मितीचा विचार केला तर माणसाचा प्रवास हा गुढवादाकडून विज्ञानवादाकडे होताना दिसतो. फार पूर्वी म्हणजे आजपासून पाच ते दहा हजार वर्षांपूर्वीच्या आढावा घेतला तर माणसाचे अस्तित्व अश्मयुगात आढळते. त्यातही पुराश्मयुग, मध्याश्मयुग व नवाश्मयुगात माणसाच्या जीवनात बऱ्यापैकी उत्क्रांती झाल्याचे लक्षात येते. तरीही माणसाचा जन्म अजूनही गुढवादातच अडकलेला दिसतो. आज विज्ञानाने अनेक संशोधनातून संशोधनात्मक अभ्यासातून सिद्ध केले की दोन सूक्ष्म सेल्स ज्याला शुक्राणू आणि स्त्री बीजाणू म्हटले जाते. यांच्या संयोगातून नवीन जीवाची निर्मिती होते व आपण ते मान्यही केले. पण तरीही प्रथम मानवाच्या उत्पत्तीच्या सिद्धांताचा अभ्यास केला तर प्रत्येक धर्म आपले वेगवेगळे सिद्धांत सांगतो; मग वैदिक हिंदू धर्म असो मुस्लिम धर्म असो किंवा ख्रिश्चन धर्म असे अनेक धर्म माणसाच्या निर्मितीचा सिद्धांत गुढवादातून म्हणजेच वेगवेगळ्या कथा रूपाने सांगतात; पण डार्विन मात्र माणसाच्या अस्तित्वाचे अत्यंत सूक्ष्म अभ्यासपूर्ण, तर्कनिष्ठ निरीक्षणात्मक अभ्यासातून उत्क्रांतीच्या सिद्धांत मांडतो व तो विज्ञाननिष्ठ निरीक्षणातून मान्यही होतो.**



पृथ्वीच्या निर्मितीचा अभ्यास असाच सूक्ष्म निरीक्षणातून लक्षात येतो. करोडो वर्षांपूर्वी सूर्यापासून दूर झालेला तप्त गोळा त्याला थंड व्हायला लाखो वर्ष लागले असावेत, तो गोळा थंड होत असताना पुढे दलदल, कुठे पाणी, तर कुठे दगड असे कितीतरी प्रकार निर्माण झाले. यातूनच सूक्ष्म जीवांची निर्मिती त्यांच्या संयोगातूनच पुढे सूक्ष्म पासून ते महाकाय प्राण्यांपर्यंत जीवांची निर्मिती झाली. यातूनच पुढे मानवाच्या उत्पत्तीचा डार्विनचा सिद्धांत समोर येतो. अनेक प्राण्यांमध्ये होमोशेपियन वंशाच्या प्राणी अर्थात यालाही नाव मानवाचेच दिले आहे. हा माकडाचा सारखा दिसणारा प्राणी हळूहळू यात बदल होत गेले. कोणत्या ना कोणत्या प्रयत्नातून वातावरणानुसार तो सरळ होऊ लागला. समोरच्या दोन पायांचा उपयोग हातासारखा करू लागला व पुढे कित्येक कालावधीनंतर तो मानवासारखा स्थितीत दिसायला लागला. असाच काही डार्विनचा उत्क्रांतीचा सिद्धांत अर्थात तर्कनिष्ठ बुद्धीला नक्कीच पटणारा आहे. मानवाच्या बाबतीत हा सगळा बदल होत असताना अर्थातच वातावरणातही बदल होत गेले. जुने प्राणी, वनस्पती लुप्त होऊन नवीन अनेक गोष्टींची निर्मिती होऊ लागली. पण या सगळ्या बदलाला तत्कालीन मानव समजू शकत नव्हता. त्यामुळे ऊन, वारा, पाऊस, गडगडणे, चमकणे याला तो कोणत्यातरी दैवी शक्तीच्या चमत्कार किंवा प्रकोप समजायचा. समाजशास्त्राचे जनक फ्रेंच तत्त्वज्ञ ऑगस्ट कॉम्प यांनीही मानवाच्या प्रगतीचा असाच तीन अवस्थांचा सिद्धांत सांगितला. ऑगस्ट कॉम्प म्हणतात, मानव जेव्हा कोणताच विचार करू शकत नव्हता, तेव्हा तो फक्त निसर्गावरच अवलंबून होता. निसर्गाच्या प्रत्येक अनुकूल प्रतिकूल परिस्थितीशी त्यांनी तादात्म्य पावलेले होते. यालाच मानवाच्या अवस्थांच्या नैसर्गिक सिद्धांत म्हटले आहे. दुसऱ्या अवस्थेत तो थोडा विचार करू लागला, त्यामुळे प्रत्येक गोष्टीमागे तो अनाकलनीय दैवी शक्ती असल्याचे समजू लागला व तिला शांत करण्यासाठी पूजा अर्चना करू लागला. हा मानवाच्या विकास अवस्थेचा दैवी शक्ती किंवा आध्यात्मिक सिद्धांत होय. तर तिसरा सिद्धांत वैज्ञानिक सिद्धांत आहे. या अवस्थेत माणूस प्रत्येक गोष्टीमागचे कारण शोधू लागला. निरीक्षण प्रयोगातून सिद्ध करू लागला व तो स्वीकारू लागला. याला म्हणतात, मानवाच्या विकास अवस्थेचा वैज्ञानिक सिद्धांत. अर्थात या अवस्थातून आजच्या आधुनिक वैज्ञानिक अवस्थेत यायला मानवाला बराच काळ लागला. हे सगळे घडत असताना मात्र जगात काही स्वार्थी, सत्ताधारी, वर्चस्ववादी, वर्णवादी लोकांचीही निर्मिती झाली. त्यांनी आपल्या स्वार्थासाठी दैवी, अद्भुत शक्ती ईश्वर अशा संकल्पना सर्वसामान्यांच्या मनात निर्माण करून भीती निर्माण केली व स्वतःचे वर्चस्व निर्माण केले. भारतातच नव्हे तर युरोप खंडाचाही विचार केला तर असेच घडलेले दिसते. युरोप खंड पंधराव्या सोळाव्या शतकातपर्यंत धर्मवादातच गुंतून होता, परंतु तेथे 14, 15, 16 व्या शतकात प्रबोधन घडून आले. अर्थात यामागील कारण होते. आतापर्यंत तेथे झालेल्या धर्मयुद्धाच्या परिणाम. जेरुसेलम व बेथलहेम ही शहरे ज्यू, ख्रिश्चन व इस्लाम धर्माच्या अनुयायांसाठी पवित्र होते. अकराव्या शतकापर्यन्त ही शहरे इस्लाम धर्म अनुयायांच्या ताब्यात होती. ती परत मिळविण्यासाठी ख्रिश्चन व इस्लाम यांच्यात नऊ धर्मयुद्ध झाली. पण यात शेवटी इस्लामी सत्ताधीशांचाच विजय झाला. कारण या युद्धाकडे पोप म्हणजे धर्मगुरूपासून ते सम्राट, सरंजामदार, व्यापारी या सर्वांनीच केवळ स्वतःच्या फायद्याचाच विचार केलेला होता. त्यातही पोपने तर या युद्धाला धर्मयुद्ध म्हणजेच कृसेडस असे संबोधले. सर्वसामान्य जनतेला या युद्धात ओढण्यासाठी जाहीर केले की, या धर्म युद्धात जे सामील होतील त्यांना पाप क्षालनापासून मुक्ती मिळेल. यामुळे सर्वसामान्य जनता धर्मयुद्धाच्या कल्पनेने भारवून गेली. परंतु या धर्मयुद्ध काळात युरोपियन यांचा अरबांशी संपर्क आला; त्यामुळे ते एकमेकांच्या अनेक नवीन गोष्टींशी ते परिचित होऊ लागले. अशातच 14,15,16 या तीनशे वर्षांच्या काळात युरोपमध्ये बुद्धिवाद वैज्ञानिक विचारसरणीवर आधारित असलेल्या संस्कृतीचा पाया घातला गेला. या कालखंडात माणसाच्या बुद्धीला, प्रतिभेला व जीवनपद्धतीला नवी दिशा मिळाली. विश्वाची रहस्य वैज्ञानिक पद्धतीने कशी उलगडता येतील हे समजून घेण्यात लोकांना स्वारस्य निर्माण झाले व हाच खरा युरोपचा बुद्धिवादाकडे प्रवास होता. युरोपने काल्पनिक गोष्टीला तार्किक बुद्धीने तपासणे सुरू केले. यातूनच विज्ञानात नवनवे प्रयोग करण्यास सुरुवात झाली. विश्वाच्या अस्तित्वाचा विचार करताना पूर्वी ईश्वर हा केंद्रबिंदू होता; आता मात्र मानव हा केंद्रबिंदू बनला यालाच 'मानवतावाद' असे म्हणतात. या कालखंडात युरोपात अनेक धाडसी संशोधन व प्रयोग झाले. त्यातूनच इ.स वी.सन 1543 मध्ये निकोलस कोपर्निकस यांनी ग्रहमाला पृथ्वी केंद्रीत नसून सूर्य केंद्रित असल्याचे प्रतिपादन केले. 1609 मध्ये गॅलिलिओने सुधारित दुर्बीण तयार केली. दुर्बिणीमुळे संशोधनाला गती मिळाली व गॅलिलिओ सूर्यावरील डागांचे निरीक्षण करणारा पहिला शास्त्रज्ञ ठरला. तसे पाहिले तर गॅलिलिओच्या आधी अनेक शतकांपूर्वी सूर्यावरील डागांचा (तमसकिलक) उल्लेख भारतातील वराहविहीर यांनी लिहिलेल्या 'बृहतसंहिता' (सुमारे सहावे शतक) या ग्रंथात आढळतो. प्रश्न असा निर्माण होतो; सहाव्या शतकात भारतात असलेल्या वराहमिहीर यांनी जे संशोधन केले त्याला पुढे वाव मिळत अधिक संशोधन झाले असते तर गॅलिलिओ ऐवजी वराहमिहीर सूर्यावरील डागांचे निरीक्षण करणारा पहिला जागतिक शास्त्रज्ञ ठरला असता. पण दुर्दैव भारताचे हजारो वर्षापासून या देशाला वर्णव्यवस्था, जातीव्यवस्था व स्वहीत जोपासण्याच्या मानसिकतेतून निर्माण केलेल्या धर्मश्रद्धा प्रथा, परंपरा यातच गुंतवून ठेवण्यात काही दुष्ट प्रवृत्तीच्या मूठभर लोकांना सारस्य होते. समाजाचे हित यापेक्षा स्वतःचे त्यांना महत्त्वाचे होते. त्यातूनच अनेक धार्मिक कल्पनांची रचना करून समाजावर त्या थोपविण्यासाठी तो यशस्वी ठरला. त्यातूनच ग्रहताऱ्यांना देवाची उपमा देऊन त्यांची पूजा-अर्चना सुरू झाली. जेव्हा शोध नव्हते तेव्हा ते चमत्कारिक वाटत होते व त्यातूनच पूजा-अर्चना सुरू झाली. पण शोध लागल्यानंतरही त्याच धार्मिक कल्पनेत जनतेला बुडवून ठेवण्यात या उच्च स्वार्थी लोकांना अधिक सारस्य निर्माण झाले. सूर्य हा स्वयंप्रकाशित तारा आहे हे खगोलशास्त्राने सिद्ध केले असले तरी अजूनही वेगवेगळ्या पद्धतीने वेगवेगळ्या नावाने सूर्याला आळवले जाते. शिकलेली उच्च शिक्षित लोक अजूनही सूर्य हा देव आहे या भ्रमाच्या भोपळ्यातून बाहेर आलेले दिसत नाही. त्यामुळे शाळा कॉलेजमध्ये सूर्यनमस्कारातून वेगवेगळ्या नावाने सूर्याला वंदन केले जाते. जे विद्यार्थी शिकत असताना अभ्यासक्रमातून सूर्य हा तारा आहे हे शिकतो, सूर्याला स्वतःभोवती फेरी मारण्यास 27 दिवस लागतात हे शिकतो, त्यालाच सूर्यनमस्कार टाकायला लावले जात असेल तर तो विद्यार्थी खरोखर चिकित्सक तार्किक बुद्धीच्या घडेल का? की आम्ही शिक्षकच त्याची तार्किक बुद्धी नष्ट करणारे ठरणार? झाडाचे फळ खाली पडते त्यातून पृथ्वीच्या गुरुत्वाकर्षण शक्तीचा शोध लागला. प्रत्यक्ष प्रयोगाद्वारे वैज्ञानिक सिद्धांतांना महत्त्व देणे आवश्यक असताना शिक्षक त्याच धर्म कल्पना वेगवेगळ्या रूपाने विद्यार्थ्यांमध्ये रुजवत असेल तर आम्ही अजूनही नवीन पिढीला परत गूढवादाकडेच नेतो की काय असे होईल. आम्हाला आमच्या देशाचा खरा विकास करायचा असेल, या देशाला खऱ्या अर्थाने महासत्ता बनवायचे असेल तर तर्कनिष्ठ, चिकित्सक, वैज्ञानिक विचार रुजवित बुद्धीवादाकडे जाणारा विद्यार्थी तयार करावा लागेल. यासाठी शिक्षकांनी तर्कनिष्ठ दृष्टीचे असणे महत्त्वाचे ठरते तरच समाजाचा प्रवास गुढवादाकडून विज्ञानवादाकडे होण्यास सोपे होईल व देश अधिक संशोधनाकडे वळेल. ■■



प्रा. माधुरी गायधनी दुपटे
मो. 9130088095

# भारतीय जनतेप्रती पत्रकारांची भूमिका




एक वर्षांपूर्वी सर्वोच्च न्यायालयातील चार न्यायाधीश यांनी पत्रकार परिषद घेतली होती आणि भारतीय जनतेसमोर देशात चालू असलेल्या वातावरण संदर्भात आपली भूमिका विषद केली होती. भारतीय संविधानाचे चार प्रमुख महत्वपूर्ण अंग आहेत. ज्या संविधानाचा मुख्य पाया स्वातंत्र्य, समता, बंधुभाव आणि समान न्याय आहे आणि त्यासाठी महत्वपूर्ण म्हणजे प्रशासन, शासन, न्यायपालिका आणि जनतेसमोर यांची जी काही बरी, वाईट कारकीर्द असेल, बरोबर किंवा चुकीचे कामे असतील, ते सांगण्याचे महत्व पूर्ण कार्य पत्रकार करतो. त्याचे फार महत्वाचे योगदान असते. आज दैनिकात काय बातमी आली, हे आवर्जून देशातील लाखो, करोडो लोक दैनिक, साप्ताहिक, टीव्हीच्या माध्यमातून पाहत असतात. वाचत असतात. त्यामुळे पत्रकारांना विशेष महत्वप्राप्त झालेले आहे. त्याला योग्य भूमिका मांडणारा म्हणून जनता त्याकडे पहाते. तो निर्भीडपणे आपले मत मांडतो. किंवा जो कोणी पत्रकार परिषद घेण्यासाठी येतो त्याला प्रश्न विचारून त्यातून योग्य, अयोग्य बाहेर काढण्याचा पत्रकारांचा सतत प्रयत्न असतो. अलीकडे देशात चार शब्द प्रचलित दिसतात. एक आतंकवाद, दुसरा दहशतवाद आणि तिसरा नक्षलवाद, चवथा जातीवाद, या चार शब्दामुळे भारतीय संविधानाच्या स्वातंत्र्य, समता, बंधूभाव आणि समान न्याय या मूळ पायाला धक्का लागेल की काय असे काहींना वाटू लागले आहे. त्या चार शब्दांनी भारतीय जनतेला भयभीत केलेले आपल्याला जाणवेल. लोकांच्या मनात भीतीचे वातावरण दिसते. याला रोखता येईल का? आणि ही रोखण्याची जबाबदारी कोणाची? प्रशासन, शासन, न्यायपालिका, आणि पत्रकारीता यांची आहे. प्रशासनाकडे पोलीस प्रशासन आणि मिल्ट्री आहे. गुप्त हेर खाते आहे. त्यांनी दहशत निर्माण करणारा, आतंकीवादी, नक्षलवादी, जातीयवादी, दहशतवादी हा कोणीही असो, कोणत्याही धर्माचा असो, पंथाचा असो आणि कोणत्याही संघटनेचा असो ज्यांनी देशाच्या अहिताचे काम केले असेल तर त्यावर कसल्याही प्रकारची दयेची भीक न घालता, त्यावर आला घालण्यासाठी ठोस भूमिका बजावली पाहिजे. भूमिका बजावत असतांना जात, पात, धर्म, पंथ आडवा येता कामा नये. म्हणजेच धर्मनिरपेक्ष पणे प्रशासनाची भूमिका असली पाहिजे. अन्याय करणाऱ्यांना जात, पात, धर्म, पंथ नसतो. अन्याय करणे ही त्याची जात आणि अन्याय करणे हाच त्याचा धर्म असतो. त्यामुळे कोणत्याही एका धर्माच्या माणसाला, त्याचा धर्म जो कोणता असेल त्यावर तासेरे ओढू नये बल्की त्याची जी काही भूमिका असेल, त्याकडून जी काही माहिती मिळाली असेल त्या माहितीच्या आधारे मुख्य दहशतवादी, आतंकीवादी, नक्षलवादीपर्यंत प्रशासनाने पोहचले पाहिजे. त्यासाठी योग्य ते लिखाण, देशाच्या हितासाठी पत्रकारांनी केले पाहिजे आणि तशी भूमिका पत्रकारांनी मांडली पाहिजे. पत्रकारांना ही जात, पात, धर्म, पंथ नसतो, जो निःपक्षपणे, निर्भीडपणे लिखाण करतो तो खरा देश हित जपणारा पत्रकार होय. आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळणार हे निश्चित झाले होते. पण संविधान तयार करणे म्हणजे तारेवरची कसरत होती. याचे कारण होते. आपल्या देशात अनेक जाती आहे. धर्म आहे, राज्य आहे, बोलीभाषा आहे. अनेक चालीरिती आहे. अस्पृश्यता आहे. उचनीच भावना आहे. त्यामुळे जरी देशाला स्वातंत्र्य मिळाले तरी देश एकसंघ राहील असे कोणालाही वाटले नसेल. संविधान सभेत अनेक अभ्यासू, जाती, धर्माची, पक्षाची माणसे होती. अनेकांनी आप आपल्या पद्धतीने प्रश्न उपस्थित केले. मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सर्व सभासद यांनी विचारलेल्या प्रश्नाना समर्पक उत्तरे देऊन योग्य ते संविधानमध्ये समाविष्ट केले आणि सर्वच जाती, धर्माच्या लोकांना समान न्याय मिळण्याच्या दृष्टीने तरतूद करून ठेवली. त्यामुळे अनेक भाषा, अनेक जाती, अनेक धर्म, अनेक राज्य, अस्पृश्यता असताना हा देश एकसंघ आहे. ही संविधानाची आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची देण आहे. किमया आहे. त्यामुळे संपूर्ण जग भारतीय संविधान हे सर्वश्रेष्ठ जगातील संविधान आहे असे बोलतात आणि त्याचे श्रेय डॉ. भीमराव आंबेडकर यांना संविधानाचे शिल्पकार म्हणून देतात. जगातही त्याना सिंबाल ऑफ नालेज म्हणून संबोधित असतात आणि तसे कोलंबीया विद्यापीठ अमेरिकामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा 72 फुटाचा पुतळा बसविलेला आहे आणि त्याखाली लिहले आहे. सिंबाल ऑफ नॉलेज हे वास्तव पत्रकारांनी ध्यानात ठेवले पाहिजे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे देशाप्रति योगदान आणि त्यांनी दिलेला संदेश आणि त्यांनी केलेली निर्भीड, निःपक्ष पत्रकारिता, पत्रकारांनी समजून घेण्याची गरज आहे. मुकनायक, जनता, शोषित भारत आणि प्रबुद्ध भारत या खरेतर वृत्तपत्रातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेले लिखाण अन्यायाला वाचा फोडणारे होते. भारतीय जनतेला जागृत करणारे होते. ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय जनते प्रती त्याचे योगदान समजून घेऊन काम केले पाहिजे. भारतीय जनतेप्रती पत्रकारांची भूमिका ही निःपक्ष असली पाहिजे, न्यायपूर्ण असली पाहिजे तर या देशातला, दहशतवाद, आतंकीवाद आणि नक्षलवाद, जातीवाद संपूष्टात येऊ शकते. म्हणजे 'भारतीय जनते प्रती पत्रकारांची भूमिका महत्व' पूर्ण असते. त्यामुळे न्यायाधीश यांनी मागे पत्रकार परिषद घेतली होती. हे विशेष समजून घेण्याची गरज आहे. ■■



अविनाश टिपले
मो.9970917389

# सिंदूर पुसणाऱ्या दहशतवाद्यांना प्रत्युत्तर म्हणजेच 'ऑपरेशन सिंदूर'




अति तिथे माती हा निसर्ग नियम असल्याने त्यापासून कुणाचीही सुटका होऊ शकत नाही. हे पुन्हा एकदा सिद्ध झाले. अखंड भारताच्या सरहद्दीला लागून असलेले काश्मीर खऱ्याअर्थाने भारताचे नंदनवन असून त्याची विशेष ख्याती आपल्या देशातच नव्हे तर संपूर्ण जगात आपल्या नैसर्गिक संपदेने जगभरातील पर्यटकांना आकर्षित करणारी असल्याने काश्मीर हे भारतियांच्या हृदयस्थानी मानण्यात येते. ज्याप्रमाणे महिलांच्या कपाळावर सौभाग्यवतीचे लेणे म्हणून शिंदूर, सुखमय आणि आनंददायी कौटुंबिक वातावरणाची उधळण करीत सौभाग्यवतीच्या कपाळावर उल्हासाने झळकतो अगदी त्याचप्रमाणे काश्मीर हे भारताच्या भुभागावर निसर्गाने निर्माण केलेली अप्रतिम अशी कलाकृती नैसर्गिक सौंदर्याने उठावदार व नटलेली दिसते, इतकी ती विलोभनीय, विविधांगी फळा फुलांनी बहरून गेलेली वनस्पती, नयनरम्य अशा पर्वत रांगा, जमिनीवर बर्फाच्छदित वर्षाव, अशा विविधांगी स्वरूपाच्या माध्यमातून भारतीय असो की परदेशी पर्यटकांच्या स्वागतासाठी नेहमीच आदराने सज्ज असलेले भारताचे नंदनवन व जगाचे आकर्षक पर्यटनस्थळ म्हणजेच काश्मीर असे म्हटले तरी ते अतिशयोक्तीचे ठरणार नाही. अशा काश्मीरवर सातत्याने लहान मोठे हल्ले सुरुच असतात, त्यातीलच मानवतेला कलंकित करणारा आणि कुण्याही सुज्ञ माणसांना दुःखाच्या मानसिकतेत नेणारा 22 एप्रिल 2025 ला निरपराध पर्यटकांवर आणि त्यातल्यात्यात पुरूषांवर लक्ष केंद्रित करून त्यांच्या पत्नी समक्ष अत्यंत निर्दयपणे गोळीबार करून दहशतवाद्यांनी अमानुष कृत्यांनी मारून टाकले. ही भारताच्या जनमानसात दिर्घकाळ पर्यंत धुमसत राहणारी घटना ठरली याबाबत अतिव दुःख झाल्याशिवाय राहत नाही. मात्र, भारताच्या कर्तबगार, तडफदार महिला कर्नल कुरेशी, विंग कमांडर व्योमिका सिंह या बहादूर महिला अधिकाऱ्यांनी पहलगाममध्ये निर्घृणपणे मारल्या गेलेल्या निष्पाप पर्यटकांवरील हल्ल्याविरोधात पाकिस्तान मधील लष्करी तळांवर 'ऑपरेशन सिंदूर' ही हवाई हल्ल्यांची धडक कारवाई करून मोहीम फत्ते केली. त्याबद्दल महिला अधिकाऱ्यांसह त्यांच्या अधिपत्याखाली कार्य करीत असलेल्या भारतीय सैनिक, लष्कर, हवाई दलाच्या उच्चाधिकाऱ्यांना हात जोडून सलाम करण्यासोबतच त्यांचे अभिनंदन आणि मायभूमीच्या रक्षणासाठी डोळ्यात तेल घालून सेवा बजावणाऱ्या सर्व सुरक्षा यंत्रणेचे मनापासून आभार. तसे मागे वळून पाहता आणि माहिती घेतली असता कळून येते की, भारत-पाक लष्करी संघर्षाचा इतिहास भारताच्या स्वातंत्र्यानंतर आणि उपखंडाच्या फाळणीनंतर 1947 च्या युद्धापासुन सुरू होतो आणि पुलवामा आत्मघाती बॉम्बस्फोटाचा बदला घेण्यासाठी 2019 मध्ये बालाकोटमध्ये केलेल्या सर्जिकल स्टाईकपर्यंत पोहोचतो. 1947 मध्ये झालेल्या पहिल्या भारत-पाक युद्धाला काश्मीर युद्ध म्हणून ओळखले जाते. तेव्हा नुकताच स्वतंत्र झालेला भारत आणि पाकिस्तान या दोन्ही देशांत तत्कालीन जम्मू - काश्मीर राज्यांवरून संघर्षाची ठिणगी पडून ऑक्टोबर 1947 मध्ये संघर्षास सुरुवात झाली. त्यावेळेस पाक समर्थक 'आदिवासी मिलिशिया'ने जम्मू - काश्मीरवर आक्रमण केले. महाराज हरीसिंग यांनी जम्मू-काश्मीरला भारतात विलीन केल्यानंतर भारताने या क्षेत्रांवर सुरक्षेसाठी आपले सैन्य पाठविले. हे युद्ध जानेवारी 1949 पर्यंत सुरू राहीले. संयुक्त राष्ट्राने मध्यस्थी केल्याने अखेर युद्ध विराम झाला. परिणामी नियंत्रण रेषेच्या रूपाने (एलओसी)भारत आणि पाकिस्तान यांच्यात विभागला गेला. पुन्हा काश्मीर प्रश्नावरून 5 ऑगस्ट 1965 रोजी सशस्त्र संघर्ष झाला. जम्मू-काश्मीरमध्ये नियंत्रणरेषा ओलांडून हजारो पाकिस्तानी सैनिक स्थानिक बंडखोरांच्या वेशात भारतीय हद्दीत घुसले होते. पाकने 'ऑपरेशन जिब्राल्टर'या नावाने गुप्त मोहीम आखली होती. काश्मीर सतत अस्थिर ठेवणे आणि स्थानिक बंडखोरांना चिथावणी देणे हा या मोहीमेचा उद्देश होता. तेव्हा भारतीय सैन्याने हल्ला चढवत जोरदार प्रत्युत्तर दिले, ज्यामुळे आंतरराष्ट्रीय सीमेवर युद्ध छेडले गेले. हे युद्ध 23 सप्टेंबर 1965 पर्यंत सुरू राहीले. अखेर तत्कालीन सोव्हिएत संघ आणि अमेरिका यांच्या मध्यस्थीमुळे युद्धविरामावर दोन्ही देश राजी झाले. पुन्हा 1971 मध्ये भारत-पाक युद्धाला तोंड फुटले. त्यास कारण होते पुर्व पाकिस्तानवरील(आताचा बांगलादेश) सैन्याची दडपशाही आणि त्या भागातून उठलेली स्वातंत्र्याची मागणी. भारताने बांगलादेशाच्या मुक्तीसंग्रामाला पाठिंबा देत युद्धात उडी घेतली. त्यामुळे पूर्व आणि पश्चिम दोन्ही आघाड्यांवर तुंबळ लढाई झाली. त्यानंतर 16 डिसेंबर 1971 मध्ये पाकिस्तानी सैन्याने आत्मसमर्पण केले आणि या युद्धामुळे बांगलादेश हा स्वतंत्र देश म्हणून अस्तित्वात आला. 1999 मध्ये भारत आणि पाकिस्तानमध्ये कारगिल युद्ध झाले. ऊंचावरील भागावर झालेला हा संघर्ष जूलै 1999 पर्यंत सुरू होता. त्यावेळी पाक सैन्य आणि दहशतवाद्यांनी जम्मू-काश्मीरच्या कारगिल भागातील पर्वतशिखरांवर कब्जा केला होता. भारताने वायुसेनेच्या 'ऑपरेशन सफेद सागर'च्या साथीने या भागावर पुन्हा नियंत्रण प्रस्थापित करण्यासाठी 'ऑपरेशन विजय'सुरू केले. भारताने 26 जुलै 1999 रोजी या भागावर पुन्हा नियंत्रण प्रस्थापित केल्यानंतर युद्ध थांबले. हाच दिवस पुढे कारगिल विजय दिन म्हणून दरवर्षी साजरा केला जातो. जम्मू-काश्मीरमधील उरी येथील भारतीय सैन्याच्या एका केंद्रावर 18 सप्टेंबर 2016 रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्यात 19 सैनिक शहीद झाले. या हल्ल्याला प्रत्युत्तर देण्यासाठी भारताने 28-29 सप्टेंबरच्या मध्यरात्री नियंत्रण रेषेपलिकडे सर्जिकल स्टाईक केले. भारतीय सैन्याने पीओके मधील दहशतवादी लॉच पॅडला लक्ष्य करीत दहशतवाद्यांना यमसदनी धाडले. त्यानंतर पुलवामा दहशतवादी हल्ल्याला प्रत्युत्तर देण्यासाठी भारतीय वायुसेनेने 26 फेब्रुवारी 2019 रोजी पाकिस्तानच्या बालकोटमधील जैश-ए-मोहम्मद या दहशतवादी प्रशिक्षण तळांवर हवाई हल्ले केले. पुलवामा दहशतवादी हल्ल्यात भारताचे 40 सीआरपीएफ जवान शहीद झाले होते. बालाकोट 'एयर स्ट्राईक'मध्ये लढाई विमानांचा वापर करतांना भारताने पाकिस्तानी क्षेत्रात घुसून दहशतवादी तळांना लक्ष्य केले. हा 1971 च्या युद्धानंतर पाकवरील पहिलाच हवाई हल्ला होता. त्यानंतर नुकत्याच पहलगाममध्ये निर्घृणपणे मारल्या गेलेल्या निष्पाप पर्यटकांवरील हल्ल्याविरोधात पाकिस्तानवर 7 में रोजी पहाटे 'ऑपरेशन सिंदूर' एअर स्टाईक करण्यात आले. यात केवळ 9 दहशतवादी तळांना लक्ष्य करण्यात आले. कारण पहलगाममध्ये दहशतवाद्यांनी अमानुषपणे पुरूष पर्यटकांवर गोळीबार करून त्यांना ठार केले. या अमानवीय कृतीचा बदला घेण्यासाठी भारतीय हवाई दलाच्या शुर महिला अधिकारी तसेच लष्कर, सैनिकांनी ज्या दहशतवादी संघटनांच्या तळांवर हल्ले करून त्यांचे दहशतवादाला खतपाणी घालणारे साम्राज्य नष्ट करण्याचा केलेला धाडसी प्रयत्न निश्चितच स्वागतार्हच आहे. अशा देशप्रेमी शुरवीर अधिकारी आणि सैनिकांच्या पाठीशी हा देश आणि देशातील जनता त्यांना पाठबळ देण्यासाठी त्यांच्या पाठीशी आहे व सदैव असेल. शेवटी भारताच्या सरहद्दीवर रात्रंदिवस सशस्त्र पहारा देऊन देशाचे रक्षण करणाऱ्या अधिकारी तथा सैनिकांना पुढील यशस्वी कारकिर्दीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा! ■■



रतन तायडे
94201 25761

